# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. २८/०८/२०१३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दिनांक २८/०८/२०१३ रोजी सभा सुचना क्र. १२ दि. २२/०८/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. राजु यशवंत भोईर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राजु यशवंत भोईर | सभापती |
| २. | श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो | सदस्य |
| ३. | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | सदस्या |
| ४. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ५. | श्री. प्रमोद जयराम सामंत | सदस्य |
| ६. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७. | श्री. राजेश शंकर वेतोसकर | सदस्य |
| ८. | श्रीम. बगाजी शर्मिला विल्सन | सदस्या |
| ९. | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| १०. | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ११. | श्रीम. मिरादेवी यादव | सदस्या |
| १२. | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| १३. | डॉ. रमेश जैन | सदस्य |
| १४. | श्री. संदिप मोहन पाटील | सदस्य |
| १५. | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| १६. | श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी | सदस्य |

**मा. सभापती :-**

नमस्कार, सर्व सन्मा. सदस्य, सदस्या तसेच अधिकारी कर्मचारी वर्ग यांचे स्वागत. सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दि. २८/०८/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १२, दि. २२/०८/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**मा. सभापती :-**

सर्व सदस्यांच्या वतीने आज आपल्या महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त शितोळे साहेब यांचा वाढदिवस आहे. तर त्यांना सर्व सदस्यांनी येऊन पुष्पगुच्छ द्यावे.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. या ठिकाणी पाच नंबरचे प्रभाग अधिकारी दिसत नाही.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

खेत्रे हे कोर्ट केससाठी ठाण्याला गेले आहेत. आणि नरेंद्र चव्हाण हे आजारी आहेत.

**प्रशांत दळवी :-**

खेत्रे ने तसे राईटींगमध्ये कळवल आहे का? कुठल्या कारणासाठी गेलेत?

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मला त्यांनी एस.एम.एस. केला होता. त्यांनी सांगितल की, सभापती साहेबांना पूर्वकल्पना द्या.

**प्रशांत दळवी :-**

मा. आयुक्त साहेब, प्रत्येक वेळा बघितलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे त्यांना कोर्टाच वॉरन्ट निघालेले आहे. हे अधिकारी निष्काळजीपणा करतात. कोर्टात वेळेवर हजर राहत नाही. आणि स्टँडींग कमिटी आली की ते गैरहजर राहतात.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मगाशी आढावा घेताना मला हे लक्षात आल आहे. मी या पूर्वीच त्यांना सांगितले आहे. आता यानंतर त्यांना लेखी इन्स्ट्रक्शन देणार की, यापुढे स्टँडिंगच्या दिवशी कोर्टात असेल तरी परवानगी घेऊन किंवा वकिलांना सांगुन तुम्ही इथे पहिले रहा. नंतर तिकडे जा. आणि तशी जर गरज असेलच तर माझी परवानगी घ्या. त्यांना हे हेन्स फॉर त्यांना अटेन्ड करायला पाहिजे. ॲट लिस्ट वॉर्ड ऑफिसरने एकाला डेंग्यु झाला आहे. त्यामुळे आले नाही. आणि खेत्रे कोर्टामध्ये गेलेत म्हणून त्यांनी सांगितल. पण यापुढे माझ्या परवानगी शिवाय त्यांनी ॲब्सेन्ट रहायच नाही.

**प्रशांत दळवी :-**

ठिक आहे. आज ते नाही. परंतु मिरारोडच्या प्रभाग क्र. ५ चे अधिकारी हे दादासाहेब खेत्रे आहेत. आज त्यांनी या मिरा भाईंदरमध्ये कार्यरत असताना आज जणु काही आपलीच मालमत्ता अशाप्रकारे तिकडे मिरारोड शांतीनगरमध्ये हैदोस घातलेला आहे. वेळोवेळी त्यांना आपण सुचना दिल्या असतानाही, सभापती महोदयांनी सुचना दिलेल्या असतानाही त्या ठिकाणी कारवाई होत नाही. अतिक्रमण अनधिकृत बांधकामाच पेव फुटलेला आहे. सभापती महोदयांनी त्याच्यावर आरोप केलेल आहे. त्याच ही काही होत नाही. नेमक कारण काय आहे? गेल्या दोन महिन्यांपूर्वी स्टँडींगमध्ये चर्चा केली होती की, त्या ठिकाणी स्टेशन परिसरात फेरिवाल्यांचा पूर्ण घेराव आहे. त्या ठिकाणी प्रवाशांना ये-जाण्यासाठी रस्ता उपलब्ध नाही. पूर्ण रस्त्यावर त्या फेरिवाल्यांच अतिक्रमण झालेल आहे. अस असताना त्या-त्या विरेंदर ज्युसवाला नामक व्यक्तीकडे ६०० फुटाची जागा कवर केलेली आहे. आम्ही त्यावेळेला सांगितल होत विधी विभागाने सांगितल हे काढण्यात येईल. स्वतः प्रभाग अधिकारी त्यावेळेला उपस्थित होते. त्यांनी ही सांगितल आम्ही तिथे निष्कर्षित करु. परंतु आज दोन महिने होऊन गेले. त्या ठिकाणची जागा निष्कर्षित केली नाही. या उलट माझा आरोप आहे की, ज्या २०० फुटाच्या जागेवर त्याने स्टे घेतला होता. वापरत होता ती जागा ६०० फुटाची होती. उरलेली ४०० फुटाच्या जागेवर परत जाऊन त्याने स्टे घेतला. याच कारण काय? आणि त्यावर कधी कारवाई होणार. या ठिकाणी आधीही दोन दिवसावर फोटो काढलेले आहेत ते मी दाखवतो. त्या ठिकाणी फेरिवाल्यांच पेव फुटलेले आहे. ४०-४०, ५०-५० फेरिवाले त्या ठिकाणी अतिक्रमण करुन बसलेले आहेत. अधिकाऱ्यांना वेळोवेळी त्या ठिकाणी काकडे इंजिनियर आहेत. प्रभाग ५ मधुन आलेले आहेत. त्यांना विचारा त्यांच्या समक्ष मी फेरिवाल्यांवर कारवाई करायला सांगत असताना खेत्रे उडवा उडवीची उत्तर देतात. का त्यांची एवढी दादागिरी चालते? त्यांना कोण पाठीशी घालते?

**श्रीकृष्ण मोहिते :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. नुकतच आपण फेरिवाले पथक चेंज केलेल आहे. पूर्ण सगळा स्टाफ बदलून नव्याने स्टाफची नियुक्ती केलेली आहे. आणि त्यामध्ये चार फेरिवाले पथक नेमलेले आहेत. त्यांच्यामार्फत कारवाई ही एकत्रितपणे सुरु आहे. कारण, ते नविन असल्यामुळे त्यांना धाडस होत नाही. एकत्रित कारवाई सध्या सुरु आहे. मिरारोड स्टेशनच्या परिसरामध्ये आपली जी गुजराती शाळा आहे त्या शाळेच्या परिसरात कायमस्वरुपी वॉचमेन नेमण्याची प्रक्रिया सुरु आहे. तर सहा वॉचमेन सेक्युरीटी आपण तिथे ठेवणार आहोत. आणि प्लस स्टार्ट गेटजवळ डंपर कालपासुन नियुक्त केलेला आहे कायमस्वरुपी. तो तिथेच उभा राहिल आणि त्यामध्ये दोन माणस असतील. आपण व्यापक मुळे आपण हाती घेऊन आठ दिवसामध्ये निश्चितच त्याची प्रसिध्दी दिसेल.

**प्रमोद सामंत :-**

मा. सभापती साहेब दोन माणस, एक डंपर देऊन अतिक्रमण हटणार नाही.

**श्रीकृष्ण मोहिते :-**

नविन पथक स्थापन केल्यापासून बऱ्यापैकी कारवाई सुरू आहे. आणि ८ दिवसात तुम्हाला ह्याचा आउुट पूट नक्की दिसेल. ह्याची मी तुम्हाला शाश्वती देतो.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, मोहिते साहेबांनी आता सांगितले की, नविन पथक चालू केल्यापासून त्याच्यावरच बोलतात.

**श्रीकृष्ण मोहिते :-**

साहेब, कालच रात्रीच मी सांगतो. काल रात्री नवघर रोडवर आपण गाड्या पकडल्या होत्या. तिथे बाजार भाडे वसूलीवाले आले होते आपल्या पथक प्रमुखांना दम दिला होता. त्याबाबत मी आयुक्त महोदयांना पण फोन करून कालच रात्री सांगितले. तर त्यांच्यावर गुन्हे दाखल करू किंवा बाजार भाडे वसुलीचा ठेका रद्द करू अस त्यांना सांगण्यात येणार आहे.

**प्रशांत दळवी :-**

साहेब, याठिकाणी माझा ठाम आरोप आहे. ज्या ठिकाणी प्रभाग अधिकारी असतात त्याठिकाणी कारवाई केली जात नाही. स्वतः नगरसेवक त्या स्टॉपवर उभे आहेत. स्वतः सभापती महोदय त्यांना फोन करून सांगतात परंतु, त्याठिकाणी कारवाई करत नाही. उध्दट पणाने बोलतात की, आम्हाला जिथे करायची तिथेच आम्ही कारवाई करणार. कोणाला काय करायचे ते करा.

**श्रीकृष्ण मोहिते :-**

तशा प्रकारची भूमिका नाही ना फेरिवाला क्षेत्रामध्ये सगळया ठिकाणी कारवाई करणार.

**प्रशांत दळवी :-**

साहेब, तुम्ही जे पथक तयार केल त्यावर प्रभाग अधिका-याच वॉच असणार का?

**श्रीकृष्ण मोहिते :-**

हो. प्रभाग अधिकारी यांच पथक प्रमुखावर नियंत्रण राहणार आहे.

**प्रशांत दळवी :-**

प्रभाग अधिका-याच्या आदेशानुसार चालणार असेल तर त्याठिकाणी आणखिन ६ महिने कारवाई होणार नाही.

**श्रीकृष्ण मोहिते :-**

अशी बाब तुम्ही आमच्या निदर्षणास आणुन दया. आम्ही निश्चित कारवाई करू.

**प्रशांत दळवी :-**

आम्ही कालचे फोटो दाखवतो आणि तुम्हास निदर्षनास देतो.

**श्रीकृष्ण मोहिते :-**

द्या आम्ही निश्चितच कारवाई करू.

**प्रशांत दळवी :-**

मा. आयुक्त महोदय, हे फोटो तुमच्याकडे मी पाठवतो. बघा तुमच्या निदर्षणास येईल. त्या ठिकाणी चायनिजच्या, भूर्जीच्या गाडया असतात. आम्ही स्वतः कारवाई करायला सांगितले साहेब, कारवाई केली त्यांनी. माने म्हणुन आपले ऑफिसर होते माने समोर त्या भरायला लावल्या परंतु २ दिवसामध्ये त्या गाडया परत सोडायला लावल्या त्याबाबतीत मोहिते साहेबांना पण ती माहिती दिली होती.

**श्रीकृष्ण मोहिते :-**

साहेब, परवा रात्री ९.०० वाजता मी स्वतः उभा राहून जेसीबी ने गाड्या तोडलेल्या आहेत.

**प्रशांत दळवी :-**

२ दिवसात आताचा जो मी फोटो पाठवला आहे.

**श्रीकृष्ण मोहिते :-**

साहेब, तुम्हाला २ दिवसात ह्याचा आऊट पूट मिळेल.

**प्रशांत दळवी :-**

धन्यवाद.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, आता त्यांनी सांगितले की, कारवाई फार जोरात चालू आहे . मला वाटत नाही. बाळाराम पाटील रोडवर कधी कारवाई झाली आहे. जेव्हापासून आपण मिटींगमध्ये प्रत्येक वेळेला बोलतो. बी.पी.रोडवर कधीही कारवाई झालेली नाही. आणि बी.पी. रोडची परिस्थिती इतकी भयानक आहे ना की, संध्याकाळचा तिथे चाललेला व्यवहार चालु असतात. आमच्या महिलांना संध्याकाळच्या वेळेला बाहेर निघण फार त्रासाच होते. आणि तिथे एक पैशाची कारवाई झालेली नाही. तिथे संध्याकाळी चालायला जागा नसते. फुटपाथ सगळे भरलेले असतात.

**राजेश वेतोसकर :-**

बी.पी.रोड नाही. नवघर रोडला पण कारवाई फक्त गाडी येते त्याच्या अगोदर सर्व फेरिवाल्यांना माहिती पडते. सगळे फेरिवाले आतमध्ये गल्लीत घुसून पुन्हा रस्त्यावर लावतात गाडी गेल्यानंतर त्यांना बरोबर खबर मिळते.

**मा. सभापती :-**

प्रभाग अधिकारी कोण आहे त्याने खुलासा करावा.

**दिलीप जगदाळे :-**

मा. सभापती साहेबांच्या मान्यतेने बोलतो, दररोज त्या ठिकाणी ८ ते १० गाडया उचलून मोहिते साहेबांच्या समोर रात्री क्रॅश केल्या जातात. नवघर रोड आणि बी.पी रोड.

**शरद पाटील :-**

बी.पी. रोड वर कधी कारवाई केली सांगा?

**दिलीप जगदाळे :-**

दररोज करतो.

**शरद पाटील :-**

दररोज कधी करता?

**दिलीप जगदाळे :-**

काल आम्ही भाजीपाला उचलला परत २ टेम्पो उचलले आणि ७ गाडया तोडल्या.

**प्रविण पाटील :-**

प्रभाग अधिकारी साहेब, तुम्हाला तिकडच ना फेरिवाला क्षेत्र माहित आहे का? रोज बसतात तिथे ना फेरिवाला क्षेत्रामध्ये तुम्ही गाडया कधी उचलता?

**शरद पाटील :-**

आपण कारवाई करतात तेव्हा शुटिंग घेतात की, अशीच कारवाई करतात?

**दिलीप जगदाळे :-**

नाही घेत.

**प्रविण पाटील :-**

साहेब, नवघर रोड हे फेरिवाल क्षेत्र आहे की, ना फेरिवाला क्षेत्र.

**दिलीप जगदाळे :-**

नाही. म्हणून तर आपण तिथे जातो.

**प्रविण पाटील :-**

किती बसलेले असतात. आता ही बसलेले असतात.

**मा. सभापती :-**

जगदाळे साहेब, हे तिकडचे स्थानिक नगरसेवक आहेत आणि त्यांच्या तक्रारी आहेत.

**श्रीकृष्ण मोहिते :-**

नवघर रोडच्या गाडया ज्या उचलल्या होत्या त्या गाडया उचलु नये. म्हणून मला एका सदस्यांनी फोन केला होता की, तुम्ही परत द्या. पण मी परत न देता रात्री त्या गाड्या तोडलेल्या आहेत.

**हेलन गोविंद :-**

हे बरोबर आहे, सत्य आहे. जेव्हा-जेव्हा अधिकारी गाड्या उठवतात तेव्हा आपलेच नगरसेवक जावून भांडतात. अस नाही की, आपण सर्व अधिकाऱ्यावर ढकलू. पण ते जावून येतात.

(सभागृहात गोंधळ)

**मुन्ना सिंह :-**

मा. सभापती साहेब, केबिन रोड नाके का मैने लेटर दिया था कि, ब्रिज के निचे हातगाडी लगती है वह हटानेके लिए वह झेरोक्स हातगाडी वालो को दिया है दर दिन मेरे ऑफिस आकर राऊन्ड मार रहे है कि, मुन्ना सिंह का लेटर है ।

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, आज सदस्याच नाव सांगत नाही ठिक आहे. पण जेव्हा त्या फेरिवाल्यांकडे जातात उचलायला तेव्हा सदस्यांच नाव सांगतात ना की ह्या सदस्यांनी सांगितले म्हणून ती आमची काम आहे का? आम्ही तक्रार केल्यानंतर तुम्ही करणार का? आपण आता तिथे ब्रिज बांधला कशासाठी ब्रिज बांधला की, तो रस्ता मोठा व्हावा. तिथुन वाहन जावीत. पण हा रस्ता छोटा झाल्यानंतर साहेब त्याच्या बाजुला बसणारे फेरिवाले आपण उचलत नाही. सरस्वती शाळा सुटली तेव्हा माणसाला चालायला जागा नाही. मोटर सायकल वाले मुलांना उडवत जातात तिथून.

**हेलन गोंविद :-**

मग भांडा ना सगळे नगरसेवकांनी भाजी मार्केट होवू दे मच्छी मार्केट होवू दे. जिथे भांडायच तिथे भांडत नाही. तुम्ही सांगा कारण लोकांचे हाल होतात.

**शरद पाटील :-**

मॅडम, आपला विषय फार चांगला आहे. आणि प्रत्येक वेळेला आपण मिटींगमध्ये बोलतो पण.

**हेलन गोंविद :-**

नगरपालिकेपासून महानगरपालिकेपासुन कशाला मार्केट बांधत नाही.

**शरद पाटील :-**

का करत नाही. मॅडम बरोबर बोलतात.

**मा. सभापती :-**

मार्केट आहेत ना एरिया वाईज.

**हेलन गोंविद :-**

कुठे आहेत? छोटे- छोटे गाळे आहेत तिथे कुठे करणार?

**शरद पाटील :-**

एखाद मोठ मार्केट व्हायला पाहिजे मॅडमच म्हणणे बरोबर आहे.

**हेलन गोंविद :-**

आमची लोक क्रॉस गार्डन जवळ असतात तिथे रस्ता पण अडतो. लोक जाणार कुठे? धंदा तर तुम्ही थांबवू शकत नाही सन्डेच्या दिवशी रस्त्यावर हालत बघा त्यांची कशी होते ती.

**प्रमोद सांमत :-**

मा. सभापती साहेब, हा एकदम महत्वाचा विषय आहे. सगळे १६ च्या १६ सदस्य फेरिवाल्यांच अतिक्रमण या विषयावर आता बोलतात. आणि आपल प्रशासन, आपले वॉर्ड अधिकारी कुठलीच कारवाई ठोस करत नाही. स्टेशन परिसरात तुम्ही जर चुकुन कधी गेलात तर गाडी चालूच शकत नाही. माणस चालू शकत नाही अशी परिस्थिती नाही. माणस चालु शकत नाही अशी परिस्थिती आहे. मिरारोडच्या दोन्ही बाजूला एका बाजूला बिरेंद्र आहे त्याला पालिकेच्या जावई सारख सांभाळता १० बाय १० वर त्याचा स्टे आहे. आणि तो ६००-७०० हजार फुटात तो धंदा लावत आहे. त्याच्यावर कोणती कारवाई करत नाही. पोस्ट ऑफिसच्या बाजुला चालायला सुध्दा जागा नाही. गटाराच काम तिथे चालू केल ते गटाराच काम करायला मिळत नाही, रस्ता बरोबर नाही रस्त्याच काम करायला तिथे मिळत नाही. अशी परिस्थिती असताना आपले अधिकारी फक्त बोलतात कारवाई करतो म्हणून स्टेशनपासुन ४ नं. २ नंबरच्या नाक्यावर आल तर त्या नाक्यावर फेरिवाल्यांमुळे ट्रॅफिक जाम होते ते पण कोणाला कळत नाही. ही जी कारवाई आता मोहिते साहेबांनी सांगितल की, १ डंम्पर आणि २ माणस देणार आहेत. त्यांना काही होत नाही. मा. आयुक्त साहेब तुम्ही स्वतः येवून बघा. संध्याकाळी जा आणि त्याची काहीतरी ठोस भुमिका घ्या. की, ते झालच पाहिजे. असे नको की, आपण माण्स दिले आणि कारवाई होत नाही. ४ नं. २ नंबरच्या पूर्ण नाक्यावर कारवाई झाली पाहिजे.

**श्रीकृष्ण मोहिते :-**

साहेब, तिथे १ डंम्पर आणि २ माणस आहेत ते कायम स्वरूपी तिथे उभी करण्यासाठी दिलेले आहेत. जेणेकरून ते उचलल्यानंतर परत थांबू नये. त्यांना भिती वाटावी म्हणून ते ठेवलेली आहेत.

**प्रमोद सामंत :-**

मला एवढच सांगायचा आहे की, तुम्ही माणस ठेवू नका. काहीतरी जादू करा आणि तो परिसर खाली करा. आम्हाला काहीच ऐकायच नाही. रोज तेच आपण बोलतो, रोज तेच ऐकतो. सभापती साहेब रोज त्याच्यावर रूलिंग देतात पण काही ॲक्शनच होत नाही.

**प्रशांत दळवी :-**

मोहिते साहेब, आपण ६-७ महिन्यापूर्वी डंम्पर तिथे ठेवत होतो. पण त्यानंतर डम्पर ठेवण बंद झाले. त्यामुळे ह्या गाड्या सगळ्या वाढल्या.

**श्रीकृष्ण मोहिते :-**

म्हणून पूर्ण स्टाफ चेंज केला आहे.

**प्रशांत दळवी :-**

त्यासाठी स्टाफ चेंज केला आहे की, अधिकाऱ्याच्या निष्काळजीपणा मुळे चेंज केला.

**श्रीकृष्ण मोहिते :-**

लोकांची ओरड होती की, कर्मचारी लोक कारवाई करत नाही. आणि गेल्यानंतर उचलल्यानंतर रस्त्यात चालता चालता परत सामान देत होते अशा तक्रारी यायला लागल्या म्हणून आपण स्टाफ पूर्ण चेंज केला आहे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

त्याच्यानंतर आणखीन एक गोष्ट निदर्षनास आली की, ज्या गाड्या जमा केल्या जात होत्या ते ब्रिजच्या खाली आणुन ठेवत होते, तिथले वॉचमन परत संध्याकाळी गाडया देत होते. त्यानंतर आम्ही निर्णय घेतला की, ताबडतोब त्यांना सांगितले की, त्यांची जबाबदारी राहिल की त्या पूढे क्रॅश केल्या पाहिजे त्याप्रमाणे कारवाई चालू केलेली आहे. गाडयांच नुकसान मोठया प्रमाणात झाले तर मला वाटते थोडीशी मदत निश्चित होणार.

**हेलन गाविंद :-**

सन्मा. शितोळे साहेब, मी तुम्हाला विनंती करते. आता भरपूर फेरिवाले झाले आहेत. प्रत्येकाच्या वॉर्डमध्ये त्रास होतो म्हणून ते बोलतात ते मान्य आहे. पण साहेब आता एक काम करावे. फेरिवाले लोक काय करतात की, गर्व्हमेंट असे, गर्व्हमेंट तसे भाजी तिथून घेऊन येतात. आता एक दुधी भोपळा जवळजवळ १५० ते २०० रु. किलो विकतात. तर हे लोक एवढी महाग भाजी विकतात ना आणि जे आमचे स्वतः एवढी वर्ष झाले डोंगरी, उत्तन, पाली येथे धंदा लावतात. तर ती लोक आता तिथे येतात, बसतात आणि हटवण्यासाठी आमच्या स्थानिक लोकांनी किती प्रयत्न केला आहे आणि ह्या लोकांकडे भाज्यांचे खुप भाव आहेत. ह्याच्यावर जरा लक्ष द्या. कारण फेरिवाले आता खुप अति करायला लागले आहेत. भाईंदरमध्ये लोक उपाशी मरायची पाळी आली आहे. आता श्रावण चालु आहे, उपवास चालु आहेत. लोक आता कडधान्य खातात. तिथे पण जरा लक्ष द्या.

(सभागृहात गोंधळ)

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त साहब एक रिक्वेस्ट है। अभि मेरा छटा साल चल रहा है। फेरिवाली बात हमेशा होती है और यहॉपर वॉर्ड अधिकारी, अतिक्रमण अधिकारी को बुलाके बात करते है और इसके बाद फिर भी रिझल्ट मिलता नही यह बात सत्य है। अधिकारी वर्ग से लेकर निचे के अधिकारी से लेकर मुकादम से लेकर बोलते है। कही ना कही साठ-गाठ है, इसलिए काम नही होते यह बात पक्की है। इन्फॉर्मेशन मिल जाती है। तो मेरी आपसे रिक्वेस्ट है आपसे शिकायत करते है तो आपका दायीत्व बनता है की आप महिने एखादी बार किसी को बोल दो तो हम सर्वे पर आयेंगे और अपने अधिकारी पर कारवाई करें। अधिकारीयों पर एक बार कारवाई हुई तो १००% शिकायत बंद हो जायेगी। अधिकारीयों पर अभि तक कारवाई हुई नी है। वह अपना एक्स्क्युज देकर

निकल जाते है। तो मै आपसे रिक्वेस्ट करता हू। यहॉपर शिकायत करते है उन्ही से बोलकर, उन्हीसे जवाब लेकर कोई मतलब नही है। आप निश्चित किजीए की, आप तीन महिनोंमे, दो महिनेमे एक बार राऊंड मारेंगे। और जहॉ गडबड हो तो कारवाई करेंगे। आपके पास रेकॉर्ड है की, फेरिवाले होना चाहिए की नही। वहॉपर है तो उसपर कारवाई किजीए।

**शरद पाटील :-**

छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरच अतिक्रमण हटत नाही. तर आम्ही दुसरी कुठून अपेक्षा करायची?

**रोहिदास पाटील :-**

साहेब, सभागृह तुम्हाला विनंती करते. सगळ्यांची साधारण अपेक्षा काय असते की, ही सभा झाल्यानंतर सात दिवसात आठ दिवसात पुढची सभा लागेपर्यंत १००% नको पण २०, ४०% तरी कारवाई व्हायला पाहिजे की नाही?

**बर्नड डिमेलो :-**

१००% होऊ दे. नंतर कोणत्या नगरसेवकाचे फोन जाता कामा नये. आता एका अधिकाऱ्याने सांगितले, कारवाई करायला गेल्यानंतर नगरसेवक फोन करतात की, ती गाडी हटवू नका.

**रोहिदास पाटील :-**

गोल्डन नेस्ट ते छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा, या रस्त्यावरच काढायला सगळे सभागृहात सांगत असताना कारवाईच नाही केली. त्यांनी करायला पाहिजे होती. मा. सभापती साहेब, ज्या दिवशी बैठक झाल्यापासून ते आजच्या दिवसापर्यंत कोणत्या अधिकाऱ्याने किती वेळा कारवाई केली. त्याचे काय अनुभव आहे की, त्यांनी कारवाई केली आणि श्री. बर्नड येऊन उभे राहिले, काका येवून उभे राहिले.

**श्रीकांत मोहिते :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. ह्या तीन दिवसामध्ये १८ हातगाड्या तोडलेल्या आहेत आणि भाजीचे जे कॅरेट्स आहेत ते ५७ जमा आहेत. ते सुध्दा तोडलेले आहेत. एक फ्रिज तोडलेला आहे. १ वॉशिंग मशिन तोडलेली आहे. ५७ फ्रुटचे कॅरेट जे भरुन आणले होते ते तोडलेले आहेत. संपूर्ण भाजीपाला उध्वस्त केलेला आहे. त्यामध्ये ६० किलो कांदे आहेत, ३७ किलो भेंडी होती. ते सगळे आम्ही उध्वस्त केलेले आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

अगर आप आकडा दे रहे हो तो फिर आप यह आकडा दिजीए की कितना परसेन्टेज कितना है बताईए।

**श्रीकांत मोहिते :-**

नविन पथक स्थापन केल्यापासून ३ दिवसात मी जी कारवाई केली ती मी सांगतो.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

अगर ०.०% है तो तो मतलब क्या है इसका?

**(सभागृहात गोंधळ)**

**बर्नड डिमेलो :-**

डॉक्टर साहब इन्होने कम से कम शुरुवात तो की है। यह तो अच्छा है की ३ दिन मे इतना अच्छा रिपोर्ट दिया है इन्होने। अभि ३० दिन मे दे दो। अगर उसमे ०.१ % आया है तो ३० दिन मे वो १.०० हो जायेगा।

**(सभागृहात गोंधळ)**

**बर्नड डिमोलो :-**

मा. सभापती साहेब, आयुक्त साहेब, माझा असा एक विषय होता की, यापुढे स्थायी समितीची मिटींग असली की, प्रत्येक प्रभाग अधिकाऱ्यांना बोलवतो प्रत्येक डिपार्टमेंटचे अधिकारी येतात. मला तरी वाटते त्यापुढे सर्वांची गरज आहे का? समजा प्रभाग क्र. १ च्या अधिकाऱ्यांची गरज नसेल, तिथला विषयच नसेल तर त्या अधिकाऱ्यांना बोलवून आपण तो वेळ का वाया घालवायचा किंवा तिथली कामं का बंद करावी ही माझी सुचना आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, असा काही विषय नाही की ज्याचा विषय नाही त्याने येवू नये.

**मा. सभापती :-**

संबंधित विषयावर प्रशासनाने प्रभाग अधिकाऱ्यांवर त्वरीत कारवाई करावी आणि अहवाल पुढच्या सेभेमध्ये द्यावा आणि कुठल्या अधिकाऱ्यावर कारवाई नाही केली तर मा. आयुक्त साहेबांनी दम द्यावा की अधिकाऱ्यांवर कारवाई करावी.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही दिलेल्या रुलिंगच आम्ही पुढच्या मिटींगमध्ये तुमच्याकडूनच रुलिंग ऐकणार. आम्ही त्या अधिकाऱ्यांना विचारणार नाही. तुम्ही सभा चालवायच्या आधी त्यांना विचारुन घ्यायचं. त्यांनी तुम्हांला रिपोर्टींग करायचे की आम्ही एवढी एवढी कारवाई केलेली आहे. उगाच सभेचा वेळ वाया घालवायचा फायदा काय? तुम्ही सांगितले इतकी टक्के कारवाई झालेली आहे. हे काम झालेले आहे. आम्ही तुम्हाला धन्यवाद देवू ना.

**मा. सभापती :-**

ठिक आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७२, दि. २४/०५/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**बर्नड डिमेलो :-**

दि. २४/०५/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**राजेश वेतोसकर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ७२ :-**

दि. २४/०५/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ६९ :-**

दि. २४/०५/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदन :- श्री. राजेश वेतोसकर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७३, त्रैमासिक जमा खर्चाचा आढावा घेणेबाबत. (दि. १ एप्रिल २०१३ ते दि. ३० जुन २०१३)

**मा. सभापती :-**

सर्व संबंधित विभागाने माहिती न दिल्या कारणाने हा विषय पुढच्या मिटींगमध्ये सविस्तर घेण्यात येईल.

**राजेश वेतोसकर :-**

मा. सभापती साहेब, पुढच्या मिटींगमध्ये घ्या पण कराबद्दल माझ्या सुचना आहेत.

**बर्नड डिमेलो :-**

माझ्या माहितीप्रमाणे अजूनपर्यंत मालमत्ता कराची कोणतीच बिल अजून निघालेली नाही. प्रत्येक वेळी कामाच्या प्रत्येक नगरसेवकाकडून आपआपल्या प्रभागामध्ये काहीतरी विकाम कामे झाली पाहिजे. ह्यासाठी हंबरडा फोडून इथे बोलतात. पण आपल्या महापालिकेकडे वसुली होवून येणारी रक्कम आहे ती वसुल होत नाही. वेळेवर बिल निघत नाही. बिल निघण्याचे कारण विचारले तर संगणकाचा जर प्रॉब्लम होत असेल तर पहिल्या पासूनची ग्रामपंचायतीची नगरपालिका हाताने बिल काढत होती. ती मार्चच्या आधी रक्कम यायची. तर अजून पर्यंत बिल का निघाली नाही आणि रक्कमा का वसुल झालेली नाही. तर मला अधिकाऱ्याने स्पष्टीकरण द्यावे.

**दिपक सावंत :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो. चालु वर्षाची बिले आहेत त्यामध्ये बी.पी.एम.सी. ॲक्ट मध्ये दुरुस्ती झाल्याप्रमाणे २ भाग करुन काढायची होती आणि ती ३ लाख प्रॉपर्टी आहे त्या सर्व प्रॉपर्टी ना. तो इफेक्ट द्यायचा होता तर संगणक जे इंडेक्ट ट्रान्स कंपनीकडे आपले आहे. त्यांना बोलावून त्याप्रमाणे सुधारणा करायच्या सुचना मा. आयुक्त साहेबांनी सुध्दा दिल्या होत्या. त्याप्रमाणे त्यांनी वर्कींग करुन २ तारखेला हा पॅच आहे. ते रेडी होईल असे सांगितले आहे. २ ते ७ तारखेमध्ये चेक करुन ही बिले काढण्यात येणार आहे. आमच्याकडून क्लोजिंग रजिस्टर वगैरे सर्व चेक करुन झालेले आहे. फक्त त्यांनी तयार न केल्यामुळे राहिलेले आहे.

**प्रमोद सामंत :-**

तुम्हाला दुरुस्तीची सुचना कधी झाली?

**दिपक सावंत :-**

गेल्या वर्षी आलेले आहे.

**प्रमोद सामंत :-**

कधी आली?

**दिपक सावंत :-**

२०१२ मध्ये अध्यादेश निघालेला आहे.

**प्रमोद सामंत :-**

२०१२ मध्ये कधी, कोणत्या महिन्यात?

**दिपक सावंत :-**

सप्टेंबर मध्ये.

**प्रमोद सामंत :-**

आता पूर्ण वर्ष झाले. अजून तुमच्या दुरुस्त्या होतात.

**राजेश वेतोसकर :-**

मा. सभापती साहेब, हा विषय गेल्यावेळेला झाला होता. त्यावेळेला बोलले होते की, महिन्याभरात बिले दिले जातील.

**प्रमोद सामंत :-**

२ भागात बिले बनवायची होती ना. पण आता पाच महिने झाले. अगोदरच गेले पाहिजे ना.

**दिपक सावंत :-**

कॉम्पुटराइज जो प्रोग्राम करणार आहे त्यांच्याकडून झाल नव्हत. त्यांच्यामुळे लेट झालेले आहे.

**राजेश वेतोसकर :-**

नाही साहेब, गेल्यावेळेला चर्चा झाली होती. तेव्हा असे सांगितले होते की संगणक विभागाने............

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, या विषयाला आकडेवारीचे महत्व देऊ नका. या विषयाला असे महत्व आले पाहिजे की, मी टॅक्स होल्डर आहे. तुम्ही नोटीस दिल्यानंतर मी अमुक दिवसात टॅक्स भरला नाही तर तुम्ही पॅनल्टी लावता आणि तुम्हीच नंतर सांगता की, १ एप्रिल नंतर १५ मे, १५ जुन पर्यंत आमची बिले इश्यु व्हायला पाहिजे. कोट्यावधी रुपयाची बिले इश्यु न झाली. महापालिकेचे नुकसान झाले. ह्याला तुम्ही कोणालाच जबाबदार धरत नाही. नागरीकांनी टॅक्स नाही भरला, अमुक दिवसात तर त्याला तुम्ही जबाबदार धरता. त्याला व्याज लावता, दंड लावता आणि महापालिकेच्या कामकाजातून मग ती कोणती सिस्टम असू दे, अधिकारी असू दे, कर्मचारी असू दे त्यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केली, त्याला कोणी विचारतच नाही. एकतर नक्की करा की, आजच्या पुढे वर्षभरामध्ये कोणालाही १ रुपयाचा दंड लावणार नाही असे रुलिंग द्या. एप्रिल पासून ऑगस्ट पर्यंतची बिले देऊ शकले नाही. ऑगस्ट नंतर तुम्ही ऑक्टोंबर पर्यंत देणार. आम्ही १ एप्रिल नंतर कधी तरी भरु. पण तुम्ही दंड घ्यायचा नाही असे सांगा. सभापती साहेबांनी असे रुलिंग द्यावे. नागरीकांना तुम्ही का त्रास देता.

**बर्नड डिमेलो :-**

प्रत्येक वेळेला तुम्ही संगणकाचे विषय सांगता तर संगणक कशाला हाताने काढा. ५ वर्षापासून मी बघतो. प्रत्येक कोणताही विषय अटकला तर संगणकावर टाकायचा आणि जर संगणकला बोलावले तर तो सॉफ्टवेअरवाला सांगतो मेरा पेमेन्ट नही दिया. हे काय चाललय? मिरा भाईंदर फक्त संगणकीय आहे. संगणकीय मला तर वाटते तलाठी कार्यालय पासून सर्व ठिकाणी आहे.

**मा. सभापती :-**

बिल न देणे आणि वसुल करण्यामध्ये काय कारण आहे?

**दिपक सावंत :-**

वसुलीमध्ये प्रॉब्लम नाही. बिल दिलीच नाही.

**प्रमोद सामंत :-**

काय प्रॉब्लम नाही. वसुलीमध्ये प्रॉब्लम आहे ना. १० टक्के वसुली झाली आहे. अर्धे वर्ष संपले ना.

**दिपक सावंत :-**

जो प्रॉपर्टी टॅक्सचा ट्रेन्ड आहे, आपण दरवर्षी बघितले, वसुली ती आहे ती शेवटच्या ४ महिन्यामध्येच वसुली होते.

**प्रमोद सामंत :-**

तुम्ही बिल दिली का? लोक जावून बिल भरतात. बिल आल्या आल्या भरतात. तुम्ही लेट फी लावू नका. इंट्रेस्ट लावू नका म्हणून पण तुम्ही बिलच देत नाही.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही ऑनलाईन सिस्टम केली आहे. धर बसल्या बिल भरु शकतात. तुमच्याकडे यायचे नाही ही सिस्टम केली आहे. आपण एखादी सिस्टम चालू केल्याचे तुम्ही आम्हाला इथे निवेदन करता. त्याचे इम्प्लीमेन्टेशन काय होते त्याचे काहीच नाही.

**दिपक सावंत :-**

नविन बिल निघाली नाही हा विषय आहे. २ तारखेला मला पण मेल आलेला आहे. संगणक विभागाला मेल आहे. २ तारखेला आम्ही बिल तयार करु. आमच्याकडून सर्व तयारी झालेली आहे. जसे आले की १५ सप्टेंबरच्या आत बिल वाटण्यात येतील.

**रोहिदास पाटील :-**

१५ सप्टेंबर पर्यंत तुम्ही बिल वाटणार. किती महिने लेट झाले असे तुमचे म्हणणे आहे. अधिकृत सांगा. नियमानुसार कधी बिल वाटायला पाहिजे होती आणि किती महिने लेट झाले?

**दिपक सावंत :-**

२ पार्टमध्ये बिल वाटायला पाहिजे. साधारणतः जुंन ते जुलै मध्ये वाटायला पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

जुन मध्ये. आता जुले झाला, ऑगस्ट झाला. २ महिने लेट झाले. तुम्ही वाटल्यानंतर आम्ही दोन महिने कोणाला काही विचारायचे नाही.

**बर्नड डिमेलो :-**

काका, प्रश्न तो नाही. सध्या उशीर झालेला आहे. येणारा पैसा रोकला, त्याचे काय? एवढा येणारा पैसा या महिन्यात येणार होता त्याचे काय? तो आला नाही. ते महत्वाचे आहे. नागरीकांना दंड करुन माफ करतो, तो प्रश्न नाही. आता येणारा पैसा ४-४, २-२ महिन्यांनी उशिरा येतो. हलगर्जीपणा कोणाचा आहे?

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

काका, बिल वाटल्यानंतर ९० दिवसांपर्यंत आपण कुठल्या प्रकारचा दंड घेत नाही.

**रोहिदास पाटील :-**

९० दिवसांमध्ये आणखीन दोन महिने वाढ.

**हेलन गोविंद :-**

शितोळे साहेब, आपले जुने जे अधिकारी आहेत ते प्रामाणिक काम करतात. पण जे नविन आलेले आहेत, त्यांच्या हलगर्जीपणामुळे सगळ्यांना ऐकावे लागते.

**सुरेश वाकोडे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, पाण्याची बिले प्रिंटींग मारण्याचे काम चालु आहे ते दोन दिवसात वाटायला सुरुवात होईल.

**रोहिदास पाटील :-**

वाकोडे साहेब, ही बिले किती महिने लेट झाली आहेत ते सांगा. तुम्ही आधी बिल कधी दिली होते?

**सुरेश वाकोडे :-**

बिल पाठवण्यामध्ये थोडासा उशिर झालेला आहे. कारण सी.एफ.सी. मधून जी बिल निघतात त्यासाठी आपला सपोर्ट घ्यायचा होता. त्यामध्ये आणखीन काही मॉडीफिकेशन करायचे होते. त्यामुळे थोडासा वेळ लागला. पण याच्यानंतरच्या बिलामध्ये उशिर होणार नाही. आपण याची पूर्ण दक्षता घेऊ, बिल वेळेवर जाण्यासाठी.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, असे निवेदन करा की, महापालिकेची सिस्टम अशी आहे की, वर्षातून ४ बिल देणार. म्हणजे ३ महिन्यांचे एक, वर्षातून ३ बिल देणार, म्हणजे ४ महिन्यांतून एक. अशी सिस्टम सांगा किती महिन्याने तुम्ही बिलींग करता ते तुम्ही सांगा.

**सुरेश वाकोडे :-**

आम्ही चार महिन्यांतून एक बिल देतो. वर्षातून ३ बिलांची प्रोव्हिजन आहे. आताचे कसं की, पहिला क्वार्टरचे बिल इश्यु करतो. सगळी बिल आपण बनवलेली आहेत. ते प्रिटींगला दिलेली आहेत. प्रिटींग करुन २ दिवसात मिळणार आहेत. ते झाले की, बिल वाटणार आहोत.

**रोहिदास पाटील :-**

दुसरा हप्ता पण लेट झाला का? पहिला तर वाटलाच नाही तुम्ही. आधी कधी बिल दिले होते ते सांगा.

**सुरेश वाकोडे :-**

दुसरा हप्ता लेट होणार नाही. आपण तुरंत करुया कारण, मी माझ्या मिटर रिडरला इन्स्ट्रक्शन दिले की ही बिल तुम्ही वाटण्यासाठी जाणार त्याच वेळेला तुम्ही रिडींगही घेऊन यायचे. म्हणजे वेळ होणार नाही आणि पुढचे बिल वेळेत जावू शकते.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. तुम्ही आधी बिल कधी दिले होते? आधीचे बिल ६ महिन्यांपूर्वी दिले होते की ८ महिन्यांपूर्वी की वर्षापूर्वी दिले होते असे मी विचारले?

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मार्च अखेरपर्यंत बिल दिलेली आहेत.

**अनिता पाटील :-**

वाकोडे साहेब, तुमच्या महितीसाठी मी सांगते. आमच्या वॉर्डात बऱ्याच लोकांचे नविन कनेक्शन चालु होते. त्याचे बिल अजून गेलेले नाही.

**शरद पाटील :-**

हा विषय महत्वाचा आहे. काही लोकांना बिलच जात नाही.

**अनिता पाटील :-**

त्या लोकांना अस वाटते की, आमच कनेक्शन लागलेल आहे. ते अनलिगल लागलेल आहे.

**हेलन गोविंद :-**

वाकोडे साहेब नविन आलेले आहेत त्यांना सांगायला पाहिजे ते खुप अभ्यासु आहेत. कुठले अधिकारी जे काम करतात ना त्याच त्याला श्रेय भेटू द्या. एवढ्या वर्षामध्ये ग्रामपंचायत पासून आमच्या गावामध्ये ग्रामपंचायत असल्यापासुन पाईप लाईन टाकली होती. डोंगरी, उत्तन, पाली चौक आमच्या लोकांना पाणी कमी यायच. पण साहेबांकडून आम्ही सतत पाठपुरावा करुन डोंगरी उत्तन पाली चौकमध्ये टप्याटप्यामध्ये पाईप लाईन टाकायच काम घेतलेल आहे. ह्याच्यात अधिकाऱ्यांचाच दोष नसतो. आपण पण कुठेतरी त्यांना आठवण करायची असते, साहेब अधिकारी आहेत त्यांच्यावर जरा लक्ष द्या. कारण इथे चोर सोडून संन्यासाला शिक्षा होते. चांगल्या चांगल्या अधिकाऱ्यांना सस्पेन्ड केले त्यामुळे आमच नुकसान झाले. कारण, आमची प्रायवेटची काम नसतात. ही पब्लिकची कामे असतात.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही आधी बिल गेल्या सप्टेंबरमध्ये दिली होती की, कधी दिली होती?

**सुरेश वाकोडे :-**

मागची बिल आपण जानेवारी महिन्यामध्ये दिली होती. जानेवारी महिन्यातली मार्च एंडिंगपर्यंत आपल वसुल झालेल आहे. त्यानंतरच बिल हे चार महिन्याच बिल आता आपण देतो. पुढच्या चार महिन्याच बिल हे आपले जे मिटर रिडर जाणार आहेत ते येतानाच मिटर रिडींग घेऊन येणार आहे. त्यामुळे पुढच बिल उशिर होणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब यांनी जी बिल पाठवली आहेत ते डिसेंबर पर्यंतची रिडींग घेतलेली पाठवलेली आहे. डिसेंबर ते आज सप्टेंबर आला, ऑगस्ट संपतो याच बिल गेलच नाही. टेक्निकल काही अडचण असेल तर खर रिपोर्टीग करा ना.

**सुरेश वाकोडे :-**

आपला कॉर्टर जो असतो तो डिसेंबर पर्यंत कन्सिडर केला असतो. डिसेंबर नंतर रिडींग घेतो आणि आपण जी बिल जनरेट केली आता बिल पेंडींग नाही आहे.

**(मा. सभापतींच्या आदेशाने सदरचा विषय पुढच्या मिटींगमध्ये घेण्याचे ठरले.)**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७४, भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथील तात्पुरत्या ठोक मानधनावरील वैद्यकिय व इतर कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देणेबाबत.

**प्रमोद सामंत :-**

मुदतवाढ द्यायची. पण तिथे एक्सरे टेक्निशियन नाही आहे. सहा महिने एक्सरे विभाग बंद आहे. त्याच अजुन का नाही येत. एक्सरेची जी फॅसिलिटी आपण दिली ती बंद करणार आहात त्याचा खुलासा करा.

**विलास ढगे :- (मा. उपायुक्त (मु.)) :-**

एक्सरे टेक्निशियन जानेवारी पासुन पुर्व सुचना न देता गैरहजर आहे. त्यांचा काल प्रस्ताव आस्थापना विभागाने माझ्या जवळ दिला आहे. मी तो आज प्रस्ताव साहेबांकडे सादर करतो. त्यामध्ये शैक्षणिक अर्हता नसल्याच्या कारणामुळे जो महापालिकेच्या सभागृहामुळे महासभेमध्ये मुद्दा उपस्थित केला होता. त्यांच्या अर्हतेबाबत आणि गैरहजेरीबाबत. मग त्यांना सेवेतुन कमी करणे आणि त्या ठिकाणी पर्यायी नियुक्त करणे या बाबतचा प्रस्ताव आयुक्त साहेबांकडे सादर करत आहोत.

**प्रमोद सामंत :-**

आम्हाला त्याला कमी करण्यामध्ये इंट्रेस्ट नाही. माझा प्रश्न असा आहे की, गेले १ जानेवारी पासुन त्या अगोदर सुध्दा ओकेज्नली तो विभाग बंद आहे. आपण ती फॅसिलिटी लोकांना देत नाही चालु केल्यानंतर तर त्याच काय आहे ती पूर्ण बंद करायची आहे का? नसेल तर त्यासाठी पर्यायी व्यवस्था काय आहे? आता आयुक्त साहेब नाही तर डी.एम.सी. बसले आहेत. तुम्ही नसतील तर आणखीन कोणी उत्तर दिल असत तुमच्या वतीने. तस काहीतरी करा ना. त्याच काय करणार ते सांगा आम्ही रेग्युलर फॉलो अप करतो.

**विलास ढगे :- (मा. उपायुक्त (मु.)) :-**

आता जोपर्यंत कार्यरत कर्मचारी जो गैरहजर आहे त्याबाबतचा निर्णय अंतिम झाल्यानंतर किंवा त्याबाबत काय करायच? आणि त्यांना जी कठोर कार्यवाही करायची आहे किंवा जे काही नियमाप्रमाणे कारवाई करायची त्याचा निर्णय झाल्यानंतर त्याला पर्यायी व्यवस्था काय करणेबाबत तो प्रस्ताव आयुक्त साहेबांकडे आज देतो. काल आस्थापना विभागाने माझ्याकडे दिलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, कस ही तुम्ही व्यवस्था करा. हा विषय वेगळा, त्यांच्यावर कारवाई हा विषय वेगळा. आम्हाला जो इंट्रेस्ट आहे जी आपण व्यवस्था सुरु केले आपत्कालीन व्यवस्था सारखी अत्यावश्यक व्यवस्था म्हणून चालू केली पाहिजे. त्यांच्यावर काय कारवाई करायची त्यांना दंड काय लावला हा विषय वेगळा आता जो संपूर्ण सेटअप आपण केलेला आहे. लोकांना माहिती झालेले आहे की, इकडे सुविधा मिळते आणि ती बंद आहे. तर ती खंडीत राहिलेली आता तुम्ही सुरु करणार की नाही? किंवा त्यांचा केसचा निकाल लागेल तेव्हा अस सांगा.

**विलास ढगे :- (मा. उपायुक्त (मु.)) :-**

याबाबत सविस्तर अभिप्राय आरोग्य उपायुक्त देतील. मी फक्त आपल्याला हे सांगतो सामान्य प्रशासन विभाग म्हणून किंवा आस्थापना विभाग म्हणून .........................

**प्रमोद सामंत :-**

आम्हाला विभागाशी घेण देण नाही. आम्हाला त्या सुविधेची गरज आहे. आणि ती मिळाली पाहिजे. आणि त्यासाठी प्रशासन पुर्णपणे निष्क्रिय आहे. आम्हाला ते उत्तर देणार हे डिपार्टमेंट उत्तर देणार पण आम्हाला सुविधा पाहिजे ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. तत्काळ तस ठरावामध्ये टाका.

**प्रमोद सामंत :-**

पानपट्टे साहेब पण आठ महिने झाले ना. आठ महिन्यापासुन काय केल?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ऑलरेडी चार पाच वेळा प्रस्ताव प्रशासनाने दिला आहे.

**प्रमोद सामंत :-**

आठ महिने झाले कोणच ॲक्शन घेत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

कारवाई आम्ही करत नाही.

**प्रमोद सामंत :-**

आयुक्त साहेब या विषयावर कोणच सिरियस नाही. आम्ही रोज ह्या डिपार्टमेंट मधून त्या डिपार्टमेंट मधुन वैद्यकिय अधिकारी डेप्युटी सगळ्यांकडे फिरत जायच. आस्थापनेमध्ये जायच काय कारवाई केली आणि कोण काही करत नाही. लोक येतात तिथे आम्ही सगळीकडे बोलतो. आणि इथे एक्सरे बंद.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, मी वारंवार त्यांना सांगितल आहे.

**अनिता पाटील :-**

पानपट्टे साहेब, पाच महिन्यापासुन मी घसा ओरडून बोलते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

पाच-सहा वेळा मी पत्र दिलेल आहे. ह्याचा पाठपुरावा मी ब-याच वेळा केलेला आहे.

**प्रमोद सामंत :-**

आम्ही रेग्युलर करतो. मला एवढच म्हणायच आहे की, एवढा फॉलोअप करुन सुध्दा एकही अधिका-यांना किंवा आयुक्तांना सुध्दा त्या गोष्टीत सिरीयस का नाही काहीतरी सोक्षमोक्ष झाला पाहिजे ना. किती दिवस चालणार ही गोष्ट?

**शरद पाटील :-**

पानपट्टे साहेब, या सगळ्या मंजु-या आम्ही द्यायच. करायच आणि तुम्ही तसच सडत ठेवायच. याचा अर्थ काय सांगा ना आम्हाला.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

माझी रिक्वायरमेंट सामान्य प्रशासनला कळवली आहे. सामान्य प्रशासन पुढची कारवाई करेल.

**शरद पाटील:-**

तुम्ही ह्याच्याकडून त्यांच्याकडे त्यांच्याकडून ह्याच्याकडे तर त्याला आम्ही काय करणार?

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेब, हॉस्पीटलच्या ज्या आपल्याला मंजु-या दिल्या. सर्व मशिनरी आल्या. त्यांचा आरोग्य विभागाने त्यांनी काम केलेले आहेत, त्यांचा बोलण्याचा अस आहे की, आता अस्थापनाने जे काही कर्मचारी पुरवले पाहिले. मला तरी वाटते आता त्यांनी उत्तर द्यावे.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु)) :-**

एक्सरे टेक्निशियनच्या दिर्घकाळ गैरहजेरी बाबत त्याप्रमाणे त्यांना ती सेवा सुरळित व नियमित चालू राहण्यासाठी पर्यायी व्यवस्था करण्याबाबतचा प्रस्ताव मा. आयुक्त साहेबांकडे आजच देतो.

**प्रमोद सामंत :-**

आम्हाला ह्याच काहीतरी ठाम उत्तर द्या कधी होईल ह्याच? ८ दिवसानंतर होईल १० दिवसानंतर होईल, आम्ही कॉन्ट्रॅक्टर करू अस काहीतरी उत्तर दयाना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ॲडीशनल टाका हे वाक्य ह्याच्यामध्ये ६ महिन्यासाठी करून घ्या. जोपर्यत निर्णय लागेल तो पर्यत ६ महिने होईल.

**प्रमोद सामंत :-**

आता हा विषय होताना. तर घेवूनच आल पाहिजे होता.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

२ वेळेस आपण ॲडव्हटाईज काढली होती. कुठल्या ॲडव्हटाईज मध्ये ऑफिसर जॉईन्ट झाला नव्हता. पुन्हा ॲडव्हटाईज काढली उदया परवा पेपरमध्ये येईल. साहेबांची मंजुरी झाली.

**रोहिदास पाटील :-**

पानपट्टे साहेब तुम्हाला जे काही पाहिजे ते सभागृहासमोर निवेदन करा. की, अशी दुरूस्ती करून ठराव मांडा आम्ही मांडतो ना. ठराव देतो ना सभागृहात आम्ही आरडा ओरड केल्यानंतर तुम्ही मागणी करता. अस रेकॉर्डवर यायला पाहिजे आणि त्याला सभागृह मान्यता देते. अस स्पष्ट यायला पाहिजे. तुम्हाला काय पाहिजे बोला.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

एक्सरे टेक्निशयनची तात्पूर्ती नेमणूक करण्यसाठी ठोक मानघनावर एक्सरे टेक्निशियनला ११ महिन्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी.

**बर्नड डिमेलो :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मिरारोड येथील भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालय, वैद्यकीय विभागांतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांच्या आरोग्य सोईसुविधांसाठी आवश्यक अधिकारी/कर्मचाऱ्यांसह रुग्णालय सुस्थितीत कार्यरत असणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने सध्या १६ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.

शासन निर्णय क्र. जाबप्र-२००१/सीआर-९३/जाबॅक/आ-४,दि. २३/१२/२००२ अन्वये सुचविलेल्या आकृतीबंध शहरी आरोग्य सेवेचा विचार करता तसेच केंद्र शासनाच्या आरोग्य कुटूंब कल्याण मंत्रालयाने Indian Public Health standards नुसार सुचविलेल्या मानकांचा विचार करता सदर कर्मचारी वर्ग अतिशय अपुरा आहे. अपुऱ्या कर्मचारी वर्गामार्फत आरोग्य सेवा दिल्यास त्यामध्ये गुणवत्ता लावणे शक्य होणार नाही. Indian Public Health standards नुसार भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयासाठी पुढील प्रमाणे स्थायी पदांची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी | ग्रेड वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | ०२ | १५६००-३९,१०० | ५४०० |
| २. | अधिपरिचारीका | १६ | ९३००-३४८०० | ४२०० |
| ३. | शस्त्रक्रिया सहाय्यक/परिचर | ०२ | ५२००-२०२०० | १८०० |

सदर पदनिर्मिती करुन सदर पदास मा. महासभा दि. २०/०९/२०११, ठराव क्र. ५४ ने पदनिर्मिती प्रस्ताव शासनास पाठवुन मान्यता मिळणेबाबत व शासन मान्यता मिळेपर्यंत सदर पदे करार तत्वावर भरणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मा. महासभेने मंजूरी दिलेली आहे. त्याचप्रमाणे दि. १९/१०/२०११ रोजी शासनास "आय.पी.एच.एस." नुसार आवश्यक पदनिर्मितीचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे.

प्रकरणात खालील प्रमाणे भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयात १६ वैद्यकीय अधिकारी, अधिपरिचारीका, शस्त्रक्रिया सहाय्यक/परिचर कार्यरत आहेत.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | प्रतिमहा रु. | एकुण रु. | ११ महिनेसाठी एकुण रु. |
|---|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | ०१ | ३८,०००/- | ३८,०००/- | ४,१८,०००/- |
| २. | अधिपरिचारीका | १३ | २०,०००/- | २,६०,०००/- | २८,६०,०००/- |
| ३. | शस्त्रक्रिया सहाय्यक/परिचर | ०२ | ९,०००/- | १८,०००/- | १,९८,०००/- |

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | ठोक मानधनावरील मुदत संपण्याची दिनांक |
|---|---|---|---|
| १. | डॉ. विजया प्रभागर अहिरे | वैद्यकीय अधिकारी | १४/०९/२०१३ |
| २. | श्रीम. स्नेहा राणे | अधिपरिचारीका | ०४/०६/२०१३ |
| ३. | श्रीम. स्विडल फर्नांडिस | अधिपरिचारीका | २०/०७/२०१३ |
| ४. | श्रीम. नेहा निलेश वनमाळी | अधिपरिचारीका | २०/०७/२०१३ |
| ५. | श्रीम. अंजली अविनाश यादव | अधिपरिचारीका | २०/०७/२०१३ |
| ६. | श्रीम. वैशाली दिपेश ठाकरे | अधिपरिचारीका | २०/०७/२०१३ |
| ७. | श्रीम. राधिका मनिष चौधरी | अधिपरिचारीका | २०/०७/२०१३ |
| ८. | श्रीम. लिडीया अंतोन करास | अधिपरिचारीका | २०/०७/२०१३ |
| ९. | श्रीम. उज्वला दिनेश सोनावणे | अधिपरिचारीका | २०/०७/२०१३ |
| १०. | श्रीम. जया नरेश पेडणेकर | अधिपरिचारीका | २१/०७/२०१३ |
| ११. | श्रीम. संघवी विशाल चौधरी | अधिपरिचारीका | ०६/०९/२०१३ |
| १२. | श्रीम. लविना स्टीफन डाबरे | अधिपरिचारीका | ०६/०९/२०१३ |
| १३. | श्रीम. जेविता परेरा | अधिपरिचारीका | ०६/०९/२०१३ |
| १४. | श्रीम. रेखा रमेश कडू | अधिपरिचारीका | १४/०९/२०१३ |
| १५. | श्रीम. सय्यद सकिना चांदबाशा | शस्त्रक्रिया सहाय्यक | २०/०७/२०१३ |

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | ठोक मानधनावरील मुदत संपण्याची दिनांक |
|---|---|---|---|
| १६. | श्री. शिवाजी व्यंकटराव वाकोरे | शस्त्रक्रिया सहाय्यक/परिचर | २०/०७/२०१३ |

तरी वरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील अकरा महिन्यांकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-१९४९ चे कलम ५३ (३) अन्वये मुदतवाढीस तसेच क्ष-किरण तंत्रज्ञ ११ महिन्याकरीता ठोक मानधनावर घेण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**रोहिदास पाटील :-**

वैदयकिय दाखला दयायचा तुमची प्रक्रीया पुर्ण झाली की नाही? तुम्ही आम्हाला लेखि देता त्याच एक्झीब्युशन कधी होणार? त्याच असेल तर ती पण मान्यता दया.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, जो पर्यंत आपल्याला पद भरता येत नाही. तोपर्यत करता येणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

मानधनावर घ्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ऑलरेडी मानधनावर आहे.

**रोहिदास पाटील :-**

मला साधसुध उत्तर द्या. वैदयकिय दाखला दयायचा तुम्ही आम्हाला लेखी उत्तर दिल आहे. की, थोडया दिवसात सुरू करतो. त्याला काही अडचण आहे का? त्यातले २ पद असेल १ पद असेल जर मानधनावर घ्याना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

पद ऑलरेडी मानधनावर मंजूर केलेले आहे. ॲडव्हटाईज काढलेले आहेत पण ते अजुन डॉ. आलले नाहीत. आता पुन्हा ॲडव्हटाईज काढतो.

**रोहिदास पाटील :-**

वैदयकिय दाखला दयायला तुम्ही कशी सुरू करणार?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

जो पर्यत पद भरणार नाही तोपर्यत होणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

कोणती पद ?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मेडिकल ऑफिसरची.

**रोहिदास पाटील :-**

मानधनावरची की .............

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मानधनावरची आहेत. टेम्पररी पद आहेत. काही परमनंटची पद आहेत.

**रोहिदास पाटील :-**

वैदयकिय दाखल्यासाठी तुम्हाला मानधनावर पाहिजे,टेम्पररी पाहिजे की परमनंट पाहिजे ? मानधनावर चालेल ना. तर त्याची मंजुरी घेतली की नाही ?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

जी मानधनावर पद आहेत ती जरी भरली, डॉक्टर आले तर आपल काम संपून जाईल.

**रोहिदास पाटील :-**

आठवडयामध्ये होईल ?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

डॉ. मिळाले तर. कारण, अस मी सांगु शकत नाही. नाही मिळाल तर मग तुम्ही अस पत्र घेवून येता. पुन्हा प्रॉब्लेम होतो. पद भरल्यानंतर सुरू होईल, डॉ. आले पाहिजे ना.

**रोहिदास पाटील :-**

टेम्पररी घ्यायला ॲडव्हटाईज काढतो?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हो. आम्ही ॲडव्हटाईज काढतो. नंतर इन्टरव्ह्यू घेवून सिलेक्शन करतो.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापतीसाहेब, आता पद वैगेरे असे विषय निघतात. कर्मचारी कोणते काकांनी सांगितल्याप्रमाणे पदनिर्मिती आणि नागरिकांना होणार त्रास. आता आपल्याच पालिकेमध्ये कॉन्ट्रॅक्ट बेस वर संगणक चालक आहेत ह्या विषयावर बऱ्याच वर्षापासून खटाटोप चालू आहे. मला नाही वाटत त्यांना कोणत्याही पक्षाचा, राजकीय पक्षाचा विरोध असेल की त्यांना परमनन्ट करावे कि करू नये? तर त्यांचा जो विषय आहे. त्याला पण अजून तात्कळत ठेवला आहे. मला तर वाटते २००३ पासुन काम करत आहे. त्यांचा पण आपण विचार केला पाहिजे. की, त्यांना कायम स्वरूपी करायचे किंवा अजुन कॉन्ट्रॅक्ट बेस वर ठेवायचे तर त्याच्यावर पण विचार झाला पाहिजे. ते पण आपल्या कामाच आहे. आणि जर एवढा स्टाफ असुन सुध्दा बिल निघत नाही, दाखले मिळत नाही. महापालिकेला नागरिकांना लागणारे दाखले ची पुर्तता होत नसेल तर कर्मचाऱ्याची गरज आहे तर का ती भरून काढू नये.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती साहेब, जिन लोगो का अनुभव है, संगणक चालक का काम कर रहे है। और उन्हे हम परमनंट नही कर रहे है। और जब भी मोका मिल रहा है। बी.एम.सी. में परमनंट का तो वह लोग इधर से छोडके जा रहे है। तो हम हर साल नये-नये अनुभव नही है इन लोगो को ले रहे है। और जिनको अनुभव है वह लोग छोडकर जा रहे है तो हमारा काम भी खराब हो रहा है।

**बर्नड डिमेलो :-**

मा. आयुक्त साहेब तुम्हाला थोडक्यात सांगतो इथे काम केलेल्या लोकांना मुंबई मध्ये उच्च न्यालयामध्ये लागली आहेत. आणि एवढया एक्सपर्ट लोकांना आपण कायम करत नसाल त्यांना एवढा अनुभव आलेला आहे की, त्यांच्या शिवाय अधिकाऱ्याच काम होत असेल. आता मी तुम्हाला एक विषय देतो. कोणती तरी एक महिला काम करत नाही. आणि ती अनुभवी आहे त्या बाईला लगातार २-२ महिन्याने इकडून तिकडे ट्रान्सफर करून काम करून घेतल जाते. मला तरी वाटते हुकुमशाही राज्यामध्ये पण अस घडत नसेल असा त्या लोकांचा वापर केला जातो. अधिकाऱ्यांमार्फत तर त्यांना का कायम स्वरूपी करू नये. आणि त्यांना न्याय द्यावा. आज त्यांनी एवढी वर्ष त्यांनी नोकरी करुन तुम्ही सांगता तुम्हाला परमनन्ट होता येत नाही. त्यांना उत्पन्न वाढल तर पदनिर्मिती होईल. आता सध्याच्या काळामध्ये त्यांना ९,५०० रुपये पगार आहे. जर आपण त्यांना कायमस्वरुपी केल तर १५ हजार रुपये पगार होईल. तर ४-५ हजाराने जवळ-जवळ ७० लोक आहेत. तर मला नाही वाटत ३ ते ४ लाखाची भर पडणार. कोट्यवधीचा महापालिकेवर बोजा पडणार नाही. तुम्हाला काय वाटते तुमचे पण काही विचार असतील तर मांडा. मला तर वाटत चुकीच चालल आहे. आणि लोकांची पिळवणुक करतात. आणि त्यांना गुलामासारख राबवल जाते. त्याप्रकारे त्यांचा वापर करुन नंतर बोलता तुम्ही कुठेतरी जा आणि तुम्ही तुमचा मार्ग शोधा. आज जर त्यांना मुंबई हायकोर्टमध्ये त्यांना जॉब मिळू शकतात आणि महापालिकेतुन तरबेज लोक आपण बाहेर काढतो आणि जे कुठल्याच कामाचे नाही अशा लोकांना आपण इथे आणुन कामाला लावतो. मला तर वाटते आज त्याच स्पष्टीकरण होऊ दे आणि सर्वांनी आपआपली मत मांडावी.

**प्रमोद सामंत :-**

मा. उपायुक्त साहेब, जे लघुलेखक आणि संगणकचालक काम करतात त्यांना परमनन्ट करणे गरजेचे आहे. २-२ वेळा शासनाची इथे तुम्हाला पत्र आलेली आहेत. त्याच काहीच कुठे कारवाई करत नाही. जर महासभेत सदर विषय घ्यायचा असेल तर देऊन टाका. तुम्ही विषय का देत नाही.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

हा विषय ऑलरेडी मा. महासभेने शिफारस केलेला आहे की पदनिर्मितीच्या प्रस्तावास ......................

**प्रशांत दळवी :-**

मा. आयुक्त महोदय, माझ्या माहितीप्रमाणे महासभेनी ही पद भरण्याकरीता मंजुरी दिलेली आहे. परंतु, हा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे.

**बर्नड डिमेलो :-**

नाही. शासनाकडे उत्तर काय आहे की, महापालिकेच उत्पन्न वाढ झाल्यास तर उत्पन्न ठरवणार कोण? दाखवणार कोण? प्रश्न असा केला की उत्पन्न वाढवल्यावर पदनिर्मिती होईल.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

आरोग्य विभागाकडचे संगणक विभागाचे, नगररचना विभागाचे आपले महापालिकेचे ठराव घेऊन प्रस्ताव चार प्रकारचे आहे ती संख्या आता मला निश्चित सांगता येणार नाही. असे चार प्रस्ताव आपण शासनाला पाठवलेले आहेत. तर त्यापैकी चारही प्रस्तावाला शासनाकडून क्वेरी आल्या होत्या त्या सर्व कंप्लायन्स करुन पाठवलेल्या आहेत. आता फक्त एक विषय राहिलेला आहे. तो किरकोळ स्वरुपाचा आहे. ही पद मंजुर केल्यानंतर, नियुक्त केल्यानंतर त्यासाठी वाढीव होणार अपेक्षित खर्च, त्याच विवरण पत्र आणि ह्या खर्चासाठी महापालिकेमार्फत विविध उपाययोजना, आर्थिक उपाययोजना करण्यात येत आहे. त्याचा तपशिल मागितलेला आहे. मी आयुक्त साहेबांशी चर्चा केली विभाग प्रमुखांशी चर्चा करुन साहेब बोलले की, मी ते मुद्दे तुम्हाला स्वतः लिहुन देतो सांगतो त्याप्रमाणे आपण पाठवू. तो एकच मुद्दा राहिलेला आहे. ते चारही प्रस्ताव साधारणतः मंजूर व्हायला शासनाकडून काही हरकत नाही अस मला वाटते. तेवढा तो विषय आहे तर तो ............................

**बर्नड डिमेलो :-**

साहेब, तुम्ही सांगितल्याप्रमाणे ते बरोबर आहे. उत्पन्न वाढीच आपल्याला द्याव लागेल आणि कोणत्या बेसिसवर आपण घ्यायच आहे की, तुमच आमदनी अठ्ठनी खर्चा रुपया अस व्हायला नको. म्हणजे आपल्याकडे सव्वा रुपया येतो आणि एक रुपया खर्च होतो हे तुम्हाला दाखवायच आहे. तर ह्या गोष्टी करुन या लोकांना न्याय देण्यासाठी तुम्ही पण हातपाय हलवले पाहिजे. प्रत्येक वेळा ढिला कारभार करतात आणि त्यांच्यावर अन्याय होतो अस मी सांगतो.

**प्रशांत दळवी :-**

सभापती महोदय, या विषयावर सदस्यांच्या भावना आपण शासनापर्यंत पोहचाव्यात आणि लवकरात लवकर करुन घ्याव अशी ही विनंती करतो.

**रोहिदास पाटील :-**

बर्नड हा प्रस्ताव तुम्ही पाठवला. आणि तुमचा पाठपुरावा चालु आहे. तुम्हाला अस वाटते अंतिम टप्प्यात आहे किंवा त्याला काय अडचण असेल तुम्ही आम्हाला काही डॉक्युमेंट द्या आम्ही त्याचा पाठपुरावा करतो ना.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

धन्यवाद. पण आपली मदत लागली तर निश्चित आपल्याला कळवतो.

**रोहिदास पाटील :-**

डॉक्युमेंट द्या. आम्ही जातो तुम्हालाही बरोबर घेऊन जातो. तुम्ही चार लोक गेले आम्ही दोन लोक गेले. स्थायी समितीचे सहा सदस्य आले तर फरक पडतो ना.

**राजेंद्र जैन :-**

आस्थापना का खर्चा आजकी डेटपर कितना परसेन्ट है?

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

लास्ट इयर ३२ % है।

**राजेंद्र जैन :-**

और कितने परसन्ट पर पदनिर्मिती कर सकते है।

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

४४ % पर.

**राजेंद्र जैन :-**

अगर अपना खर्चा कम है तो फिर अडचन कहाँपर है?

**बर्नड डिमेलो :-**

साहेब, टेम्परररी कर्मचाऱ्यांबाबत रुलिंग द्या की, लवकरात लवकर त्यांना कायम करण्यात यावे.

**मा. सभापती :-**

लवकरात लवकर शासनाकडे पाठवून मा. महासभेमध्ये मुदतवाढीचा अंतिम निर्णय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ७४. :-**

भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथील तात्पुरत्या ठोक मानधनावरील वैद्यकिय व इतर कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देणेबाबत.

**ठराव क्र. ७० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मिरारोड येथील भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालय, वैद्यकीय विभागांतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांच्या आरोग्य सोईसुविधांसाठी आवश्यक अधिकारी/कर्मचाऱ्यांसह रुग्णालय सुस्थितीत कार्यरत असणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने सध्या १६ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.

शासन निर्णय क्र. जाबप्र-२००१/सीआर-९३/जाबॅक/आ-४,दि. २३/१२/२००२ अन्वये सुचविलेल्या आकृतीबंध शहरी आरोग्य सेवेचा विचार करता तसेच केंद्र शासनाच्या आरोग्य कुटूंब कल्याण मंत्रालयाने Indian Public Health standards नुसार सुचविलेल्या मानकांचा विचार करता सदर कर्मचारी वर्ग अतिशय अपुरा आहे. अपुऱ्या कर्मचारी वर्गामार्फत आरोग्य सेवा दिल्यास त्यामध्ये गुणवत्ता लावणे शक्य होणार नाही. Indian Public Health standards नुसार भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयासाठी पुढील प्रमाणे स्थायी पदांची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी | ग्रेड वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | ०२ | १५६००-३९,१०० | ५४०० |
| २. | अधिपरिचारीका | १६ | ९३००-३४८०० | ४२०० |
| ३. | शस्त्रक्रिया सहाय्यक/परिचर | ०२ | ५२००-२०२०० | १८०० |

सदर पदनिर्मिती करुन सदर पदास मा. महासभा दि. २०/०९/२०११, ठराव क्र. ५४ ने पदनिर्मिती प्रस्ताव शासनास पाठवुन मान्यता मिळणेबाबत व शासन मान्यता मिळेपर्यंत सदर पदे करार तत्वावर भरणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मा. महासभेने मंजूरी दिलेली आहे. त्याचप्रमाणे दि. १९/१०/२०११ रोजी शासनास "आय.पी.एच.एस." नुसार आवश्यक पदनिर्मितीचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे.

प्रकरणात खालील प्रमाणे भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयात १६ वैद्यकीय अधिकारी, अधिपरिचारीका, शस्त्रक्रिया सहाय्यक/परिचर कार्यरत आहेत.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | प्रतिमहा रु. | एकुण रु. | ११ महिनेसाठी एकुण रु. |
|---|---|---|---|---|---|
| ४. | वैद्यकीय अधिकारी | ०१ | ३८,०००/- | ३८,०००/- | ४,१८,०००/- |
| ५. | अधिपरिचारीका | १३ | २०,०००/- | २,६०,०००/- | २८,६०,०००/- |
| ६. | शस्त्रक्रिया सहाय्यक/परिचर | ०२ | ९,०००/- | १८,०००/- | १,९८,०००/- |

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | ठोक मानधनावरील मुदत संपण्याची दिनांक |
|---|---|---|---|
| १. | डॉ. विजया प्रभागर अहिरे | वैद्यकीय अधिकारी | १४/०९/२०१३ |
| २. | श्रीम. स्नेहा राणे | अधिपरिचारीका | ०४/०६/२०१३ |
| ३. | श्रीम. स्विडल फर्नांडिस | अधिपरिचारीका | २०/०७/२०१३ |
| ४. | श्रीम. नेहा निलेश वनमाळी | अधिपरिचारीका | २०/०७/२०१३ |
| ५. | श्रीम. अंजली अविनाश यादव | अधिपरिचारीका | २०/०७/२०१३ |
| ६. | श्रीम. वैशाली दिपेश ठाकरे | अधिपरिचारीका | २०/०७/२०१३ |
| ७. | श्रीम. राधिका मनिष चौधरी | अधिपरिचारीका | २०/०७/२०१३ |
| ८. | श्रीम. लिडीया अंतोन करास | अधिपरिचारीका | २०/०७/२०१३ |
| ९. | श्रीम. उज्वला दिनेश सोनावणे | अधिपरिचारीका | २०/०७/२०१३ |
| १०. | श्रीम. जया नरेश पेडणेकर | अधिपरिचारीका | २१/०७/२०१३ |
| ११. | श्रीम. संघवी विशाल चौधरी | अधिपरिचारीका | ०६/०९/२०१३ |
| १२. | श्रीम. लविना स्टीफन डाबरे | अधिपरिचारीका | ०६/०९/२०१३ |
| १३. | श्रीम. जेविता परेरा | अधिपरिचारीका | ०६/०९/२०१३ |
| १४. | श्रीम. रेखा रमेश कडू | अधिपरिचारीका | १४/०९/२०१३ |
| १५. | श्रीम. सय्यद सकिना चांदबाशा | शस्त्रक्रिया सहाय्यक | २०/०७/२०१३ |
| १६. | श्री. शिवाजी व्यंकटराव वाकोरे | शस्त्रक्रिया सहाय्यक/परिचर | २०/०७/२०१३ |

तरी वरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील अकरा महिन्यांकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-१९४९ चे कलम ५३ (३) अन्वये मुदतवाढीस तसेच क्ष-किरण तंत्रज्ञ ११ महिन्याकरीता ठोक मानधनावर घेण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो　　　　अनुमोदन :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७५, घोडबंदर, ट्रक टर्मिनल (आरक्षण क्र. ३२६) चा वापर सुरु करण्याकरीता संपूर्ण परिसर खडीकरण करणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय / आर्थिक मान्यता देणे.

**बर्नड डिमेलो :-**

प्रकरण क्र. ७५, मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत मौजे घोडबंदर येथे आरक्षण क्र. ३२६, ट्रक टर्मिनल करीता राखीव आहे. सदर आरक्षणाच्या एकूण ३४,९०० चौ.मीटर क्षेत्रापैकी २१४००.८२ चौ.मीटर क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. मिरा-भाईंदर शहरातील रस्त्यावर बेकायदेशिर उभी राहणारी वाहने, ट्रक या पुढे ट्रक टर्मिनल च्या जागेवरच उभी करावयाची असल्याने सदर ट्रक टर्मिनल ची जागा वाहने उभी करण्यासाठी समतल व चिखल असल्याने माती भरावावर खडीकरण करणे ची आवश्यकता आहे. सदर कामासाठी रु. ४७,५९,१३३/- एवढा खर्च येणार आहे. तरी सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**शर्मिला बगाजी :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

खडीकरण करायच म्हणजे याच स्वरुप काय असेल?

**दिपक खांबित :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, जे आपल्याकडे २१,४०० स्क्वेअर मी. जागा ताब्यात आले आहे. त्यापैकी १२० मी. X ५६ मी. ची जागा आहे. त्याच्यावर आपण डब्ल्यू.एम. करतो. म्हणजे तिकडे जी भरणी केलेली आहे. त्याच्यावर ट्रक मोठे उभे राहणार. तर २ लेयर स्क्रोलिंग करुन खडीकरण करतो. त्या ठिकाणी एस.पी. साहेब स्वतः आले होते. मा. महापौर मॅडमकडे मिटींग झाली. त्यावेळेला अस ठरल की, शहरामध्ये जे रात्री वाहन उभे राहतात ट्रक वैगेरे टेम्पो वैगेरे ते कुठेच उभे नाही करायचे. फक्त ह्याच ठिकाणी उभे करायचे. तर पोलिसांनी सांगितल की, तुम्ही आम्हाला १२ X १२ चे २ रुम बांधुन द्या. तिकडे आमचे कायमचे पोलिस राहतील आणि आपल्याकडून २-२ पाळीत सुरक्षा रक्षक द्यायचे आहेत. अस झाल ते.

**शरद पाटील :-**

माती भराव करणार होते ना?

**दिपक खांबित :-**

माती भराव केलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

हे जे पार्कींग करणार त्या पार्किंगला काही चार्ज करणार की नाही? आपल्याला उत्पन्नाच काय साधन आहे की नाही? ह्याच्यामध्ये तुम्ही उल्लेखच नाही केला. ह्याच्यामधुन आपल अपेक्षित उत्पन्न काय आहे? जशी लोकांची सोय झाली पाहिजे. गाडी वाल्यांची सोय झाली पाहिजे तर महापालिकेच आर्थिक उत्पन्नाची बाजु काय? त्याला आपण चार्ज लावणार काय करणार? अन्य ठिकाणी ज्या-ज्या ठिकाणी पार्कींग लॉट आहेत.

**बर्नड डिमेलो :-**

काका, कस आहे ते, आता आपण टोचण लावुन त्या गाड्या उचलल्या जातात. त्या ठेवण्यासाठी आपल्याला जागा नाही. आणि शहरामध्ये जेवढे आरक्षित जागा आहे. त्या आपण डी.पी. प्लॅनमध्ये काम करायची आहे. जिथे-जिथे ज्या कामासाठी जमिनी जे आपण आरक्षित ठेवलेले आहेत. ते आपल्याला प्रत्येक काम करायची आहे. माझा तर त्यावर उलट प्रश्न आहे. अजुन किती जमिनि डी.पी. प्लान मध्ये आलेल्या आहेत. त्या जमिनि लवकरात लवकर ताब्यात घेऊन ज्या-ज्या प्रक्रिया करतील ते शहरामये अन्य गोष्टी व्हायला पाहिजे. नगरपालिकेची महानगरपालिका झाली प्रत्येक वेळेला आपण हे करुन कामाला गती मिळत नाही. म्हणून प्रत्येक वॉर्डात जमिनी आरक्षित आहेत त्या ताब्यात घेऊन गार्डन असो, शाळा असो, वाहनतळ सांगितल त्या प्रत्येक गोष्टी लवकरात लवकर व्हायला पाहिजे.

**शरद पाटील :-**

३६५ जागा सगळी ती जागा ताब्यात घ्यायची आहे ते घेत नाही अजुनपर्यंत आपण आणि आता काकांनी जस सांगितल की, आम्ही एवढा खर्च करतो तर इन्कम सोर्स पण नको? आज टोलनाके बसतात. आज महाराष्ट्र गव्हरमेंट खर्च करते, कुठल्या कंपनीला टोल देते त्यांच्याकडून पैसे वसुल करतात.

**बर्नड डिमेलो :-**

करु ना. सोयी सुविधा केल्यानंतर करु काय घ्यायच काय नाही? पहिला जागा तर उपलब्ध होऊन द्या.

**रोहिदास पाटील :-**

बी.ओ.टी. तत्वावर लोक डेव्हलप करतात. त्याचे चार्जेस घेतात. आपण का ..............

**दिपक खांबित :-**

काका, ह्या बाबतीत कस आहे की, पॉलिसी करायची काम सुरु आहे. कुठल्या गाड्यांकडून किती पैसे घ्यायचे. त्याच दरपत्रक ठाण्यामधुन मागवल आहे.

**शरद पाटील :-**

तसा विषय आणा ना.

**प्रमोद सामंत :-**

काका या ठरावात घ्यायची गरज नाही. ही सुविधा जी लोकांना द्यायची आहे त्याच हे काम करुन घेऊ. आणि तसा सविस्तर प्रस्ताव पुढच्या मिटींगमध्ये आणा की हे काम झाल्यानंतर आपण कस रेव्हेन्यू ................

**शरद पाटील :-**

लोकांना सुविधा देणार आहोत म्हणजे आपण नक्की कोणाला सुविधा देणार आहोत?

**प्रमोद सामंत :-**

ट्रकसाठी रस्त्यावर जे ट्रक उभे राहतात. त्यांना एका ठिकाणी पार्क करण्यासाठी व्यवस्था आहे ही.

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेब, आता अन्य राज्यातुन मिरा भाईंदर हे व्यापाऱ्याच शहर आहे. आणि भरपूर माल घेऊन येणारे ट्रक आहे. शहरामध्ये कुठे ही येऊन गाड्या लावतात. त्याने आपल्या नागरिकांना त्रास होतो. आता जी आरक्षित जागेत आपण वाहनतळ करणार आहोत. प्रत्येकाला तिथे वाहन ठेवण्यासाठी जागा होईल. वाहन खाली झाल्यानंतर तिथे वाहन ठेवला तर तिथे तो व्यवहारामध्ये मोकळा होईल. ह्या प्रकारचा वाहनतळ शहरामध्ये पाहिजे. शहरामध्ये कुठेही लावतात. परिवहन विभागाला म्हणा, ऑटोरिक्षावाल्याला म्हणा किंवा नागरिकांना म्हणा जो त्रास होतो त्याच्यापासुन ............................

**दिपक खांबित :-**

साहेब, मा. महासभेपुढे सादर करतो.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय, यह जो काम करते है और जहाँ-जहॉ काम करते है हर जगह से ट्रान्सपोर्ट पैसे देते है। उसमें डब्ल्यू.पी.एम. पी.एम. सब निकलता है। और कही कही घरो की भरणी होती है। वहाँ पर कई घरो के रॅबिट का सामान भरणी करते है। जितना सामान निकलता है उसका हम निकालके चला जाता है, और यहाँ भरणी का पैसा लेते है, तो क्या जो निकलता है उसको नया भरणी युज कर सकते है क्या?

**दिपक खांबित :-**

भरणी हुई नहीं है।

**राजेंद्र जैन :-**

सालभर में हम कितनी भरणी करते है? कितने प्रस्ताव ऐसे आते है जो भरणी का पैसा देते है। अगर हम प्लानिंग करे और वह सब पैसा हम टाईम से पहले प्लानिंग करले की, यहाँ-यहाँ भरणी करनी है तो मेटल ट्रान्सफर को भी दे सकते है ना।

**दिपक खांबित :-**

भरणी हम लोग कही भी महानगरपालिका नही करती जहाँ भी करती है फ्री में करती है।

**प्रमोद सामंत :-**

यह भरणी नही स्क्रालिंग है।

**राजेंद्र जैन :-**

आपने बोला ना डब्ल्यू.पी.एम. डालेंगे।

**दिपक खांबित :-**

डब्ल्यू.पी.एम. पत्थर है।

**राजेंद्र जैन :-**

खडी बहुत निकलती है।

**दिपक खांबित :-**

मट्टी हम कही से भी खरीद के नही लाते है जो फ्री में मिलती है बॉम्बे से आती है, सब जगह से आती है वही डलवाते है।

**राजेंद्र जैन :-**

साहब, डब्ल्यू.पी.एम. ३ मीटर से निकलता है। अभी हमारे यहाँ काम चल रहा है। जगह जगह पे ढेरा लगा है। वह सारा साईड पे पडा रहता है। वह लेके जाते है। मैंने पुछा उनको की, यह युजकर सकते है तो हम यूज करते है। पैसा आपको देते है लेकिन उसीको यूज करते है। निकालने के पैसे देते है उसको।

**दिपक खांबित :-**

उसको कन्टीन्यू नहीं रहता है।

**बर्नड डिमेलो :-**

खांबित साहेब, वाहन तळाच झाल. आपल्या शहरामध्ये अजुन पर्यंत आपल्याला विकसित करण्याची आणि डी.पी. प्लान म्हणून जे आरक्षित आहे ती कोणती कोणती आहे ते सांगा.

**प्रमोद सामंत :-**

त्या गोषवाऱ्यांमध्ये त्याच प्रोव्हिजन लिहीत जा. बऱ्याच वेळा अस होत आपण प्रोव्हिजन लिहित नाही.

**राजेश वेतोसकर :-**

माझी पण सुचना आहे. हा वाहन तळचा विषय आहे ना. अस टेम्पररी वाहनतळ आपण करु शकतो का नवघर रोड परिसरात?

**दिपक खांबित :-**

होते ना. नवघर कॉलेजच्या समोर मैदान तलावाच्या बाजुला आहे. तिथे सगळे मातीचे ढिगळे झाले. ती माती काढतो तिथे लेवल करतो.

**राजेश वेतोसकर :-**

आमच्या इथे आरक्षित जागा आहे. १११ मध्ये त्याच्यामध्ये टेम्परी वाहनतळ उभे केले तर आमच्या परिसरात भरपूर अनधिकृत वाहनांचा त्रास आहे.

**दिपक खांबित :-**

तिकडे रिझर्व्हेशन कुठे आहे?

**राजेश वेतोसकर :-**

आहे ना. १११ रिझर्व्हेशन आपल्या ताब्यात आहे.

**दिपक खांबित :-**

तो गार्डनच आहे.

**राजेश वेतोसकर :-**

पण तो आपल्याला टेम्पररी करायचा आहे ना.

**दिपक खांबित :-**

त्यात नाही करु शकत.

**राजेश वेतोसकर :-**

त्यामध्ये तात्पुरत्या स्वरुपात नाही करु शकत?

**दिपक खांबित :-**

नवघरला एस.एन. कॉलेजच्या समोर मैदानआहे. आपल त्याला मार्केटच रिझर्व्हेशन केले. तोपर्यंत आपण टेम्पररी पार्किंगच करतो. नवघर एरिया करिता.

**राजेश वेतोसकर :-**

मग तसच आपल्याकडे पण करु शकतो.

**दिपक खांबित :-**

जवळच आहे ना ते.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ७५ :-**

घोडबंदर, ट्रक टर्मिनल (आरक्षण क्र. ३२६) चा वापर सुरु करण्याकरीता संपूर्ण परिसर खडीकरण करणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय / आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ७१ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत मौजे घोडबंदर येथे आरक्षण क्र. ३२६, ट्रक टर्मिनल करीता राखीव आहे. सदर आरक्षणाच्या एकूण ३४,९०० चौ.मीटर क्षेत्रापैकी २१४००.८२ चौ.मीटर क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. मिरा-भाईंदर शहरातील रस्त्यावर बेकायदेशिर उभी राहणारी वाहने, ट्रक या पुढे ट्रक टर्मिनल च्या जागेवरच उभी करावयाची असल्याने सदर ट्रक टर्मिनल ची जागा वाहने उभी करण्यासाठी समतल व चिखल असल्याने माती भरावावर खडीकरण करणे ची आवश्यकता आहे. सदर कामासाठी रु. ४७,५९,१३३/- एवढा खर्च येणार आहे. तरी सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदन :- श्रीम. शर्मिला बगाजी**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७६, मिरा गांव सातकरी तलावाचे सुशोभिकरण कामातंर्गत कुंपणभिंत बांधणे कामाच्या खर्चास प्रशासकीय आर्थिक मान्यता देणे.

**बर्नड डिमेलो :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरागाव येथे एम.आय.डी.सी. जवळ सातकरी तलाव असुन सदर तलावाचे सुशोभिकरण काम करावयाचे आहे. सदर तलावाच्या बाहेरील बाजुस कुंपण बांधण्यात आलेले असून आतील बाजूस देखील कुंपण भिंत बांधुन दोन्ही कुंपणभिंतीच्या मधील जागेत जॉगिंग ट्रॅक करुन इतर सुशोभिकरण काम करावयाचे आहे. सदर कामांतर्गत प्रथम टप्प्यात आतील बाजुस कुंपणभिंत बांधणे कामी रु. ४०,६३,४००/- रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर तलावात जॉगिंग ट्रॅक तयार करुन सुशोभिकरण इ. कामे सुध्दा हाती घेणे आवश्यक आहे. सदर कामी रु. ४३,६१,६००/- एवढा खर्च अपेक्षित असून सदर अंदाजपत्रकास देखील ही सभा मान्यता देत आहे. यापूर्वी सदर जागेवर धोबीघाट बांधण्याचे कामास मा. स्थायी समितीने मान्यता दिली होती. सदर ठराव अधिक्रमित करुन वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

तुम्ही धोबीघाटाला मान्यता दिली होती. तर तुम्ही तो पहिला विखंडीत का नाही केला?

**बर्नड डिमेलो :-**

त्याच्यात दिलेले आहे ना.

**शरद पाटील :-**

त्याच्यात असे देवून चालत नाही. असा विषय होवू शकत नाही. या विषयामध्ये ही पूर्ण सदस्यांची दिशाभूल आहे. प्रत्येक वेळेला एकाच विषयावर २-२ ठराव होतात. २-२ ठिकाणी मंजूरी दिली जाते आणि ते विषय इथे आलेले असतात. नंतर कोण तरी कोर्टात जातो आणि त्याचा सर्व भुर्दंड कोणत्या तरी सदस्याला भोगावा लागतो.

**बर्नड डिमेलो :-**

प्रश्न असा आहे की, तिथे धोबीघाटाला नागरीकांचा विरोध आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, आम्ही कुठचा विरोध आहे, काय आहे त्याबद्दल बोलत नाही. तुम्ही ते करु नका.

**मा. सभापती :-**

ठरावामध्ये लिहलेले आहे ना.

**शरद पाटील :-**

ठरावामध्ये असे लिहून नाही चालत. प्रकरण क्र. ७९ चा ठराव मी मांडत आहे. मनपा क्षेत्रातील एम.आय.डी.सी. जवळील सातकरी तलावाचे सुशोभिकरण करणेकरीता दि. २८/०८/२०१३ च्या मा. स्थायी समिती सभेमध्ये बांधकाम विभागाने आर्थिक व प्रशासकीय मंजुरीकरीता प्राप्त विषय ठेवण्यात आलेला आहे. यापूर्वी दि. २५/०५/२०११ च्या मा. स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र. २५ ने या तलावावर धोबीघाट बांधण्याचा प्रस्ताव ठेवून रु. ३५ लक्ष रक्कमेचे अंदाजपत्रकास मंजूरी घेतलेली होती.

सार्वजनिक बांधकाम विभागाने दि. २५/०५/२०११ ने स्थायी समितीमध्ये रु. ३५ लाखाचे खर्चास मंजूरी घेतलेली असताना व या ठरवाच्या अनुषंगाने खर्च झालेल्या कामाची माहिती स्थायी समिती सदस्यास देणे बंधनकारक आहे. आजच्या सभेमध्ये या तलावाचे सुशोभिकरणाचा प्रस्ताव ठेवून रु. ४० लाख खर्चाची मंजूरी मागणे संपूर्णपणे सभागृहाची दिशाभूल करणारे आहे.

दि. २५/०५/२०११ व दि. २८/०८/२०१३ या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये याच तलावावर धोबीघाट बांधणे व तलावाचे सुशोभिकरण करणे या खर्चास मंजूरी मागवून बांधकाम विभागातील अभियंत्यांनी सभागृहाची व प्रशासनाची दिशाभूल केलेली आहे.

तरी यास जबाबदार असणाऱ्या अभियंत्यावर कारवाई होणेकरीता मी ठराव मांडीत आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७६ करिता दोन ठराव आलेले आहेत.

**प्रशांत दळवी :-**

आमची एक सुचना आहे. तिकडच्या स्थानिक लोकांचा विरोध आहे. जो ठराव अगोदर त्याला पारित करण्यात आला होता. तर सदरचा ठराव रद्द करण्यात यावा.

**प्रविण पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, एखाद्या विषयावर असे दोन ठराव आहे. त्यापैकी एक विषय पहिला मंजूर झालेला. आता प्रशासनाने विषय दिलेला आहे. तर तसा विषय तुम्ही आणलाच का? आणि त्यावेळेला दोन विषय येतात. त्यावेळेला आमचा प्रॉब्लम होतो ना. तुम्ही हा विषय आणलाच कशाला? ऑलरेडी पहिला विषय मंजूर झालेला होता. मग असे असताना हा विषय पुन्हा आणलाच कशाला?

**मा. सभापती :-**

तिकडच्या आधीच्या धोबीघाटासाठी स्थानिक रहिवाश्यांचा विरोध होता. त्या लोकांनी काम बंद केले होते आणि नविन प्रस्ताव मागणीप्रमाणे इथे आलेला आहे.

**राजेश वेतोसकर :-**

पालिकेने कुठला खर्च केला आहे का त्या संदर्भात? मग त्याचा खुलासा करा ना.

**शरद पाटील :-**

मा. सभापती महोदय, तिथे धोबीघाट असणं किंवा सुशोभिकरण असणं हा विषयच नाही. अधिकाऱ्यांनी आमची दिशाभूल केलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

हा कार्यपध्दतीचा विषय आहे.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय, एक खुलासा करा की, हा करता येतो का? त्यांनी खुलासा करावा.

**मा. सभापती :-**

साहेब, दोन ठराव आलेले आहेत. आता मतदान होणार.

**प्रविण पाटील :-**

समोरच्यांनी आम्हाला सांगावे की एका ह्याच्यावर तुम्ही २-२ काम सांगतात. प्रशासनाने पहिला विषयच आणायला नाही पाहिजे.

**मा. सभापती :-**

आता दोन ठराव आलेले आहेत. मतदान घेवू या. नंतर त्यांच्याकडून खुलासा घेवू या.

**प्रविण पाटील :-**

ह्याच्यामध्ये एक ठराव मंजूर होणारच आहे. एका विषयावर तुम्ही दोन-दोन ठराव दिले. मागच्या वेळी वेगळा होता, आता वेगळा आहे. तुम्ही आम्हाला क्लिअर करा. आम्ही आमची भुमिका नंतर मांडतो.

**रोहिदास पाटील :-**

त्यांनी खुलासा मागितला आहे. ठराव मतदानाला टाकायच्या आधी. एक ठराव झालेला आहे. त्याच्यावर त्यांचा कामाचे उद्घाटन झालेले आहे. आमदार गिल्बर्ट मेन्डोंसा यांनी उद्घाटन केलेले आहे. ते झाल्यानंतर त्यांच्यावर खर्च केला, नाही केला. केला असेल, विरोध झाला असेल किंवा विरोध झाल्यानंतर तो ठराव पहिला रद्द होणे गरजेचे आहे की नाही? ही माहिती ते मागतात.

**दिपक खांबित :-**

पूर्वीच्या कामावर काहीच खर्च झालेला नाही. कामाची वर्क ऑर्डर दिल्यानंतर ठेकेदार जेव्हा तिकडे गेला चौकी वगैरे घातली, तेव्हा संपुर्ण पेणकर पाडा आणि मिरा गावातल्या लोकांनी त्याला विरोध केला. जवळ-जवळ २०० लोक त्या गावातले आले होते आणि त्यांनी ती चौकी तोडली. त्यावेळेला ठेकेदाराला मारहाण केली. मग त्यांनी हे हे दिले की हे इथे करायचे नाही. त्यावेळेला श्री. विक्रमकुमार आयुक्त होते. त्यावेळेला आम्ही २-३ ठिकाणी जागा शोधल्या. चेण्याला वगैरे जिकडे पाणी इझीली अव्हेलेबल होईल, ह्याप्रमाणे आम्ही जलसंपदा विभागाला चेणा या ठिकाणी असा आम्ही प्रस्ताव १-२ पाठवला आहे की आम्हाला जागा उपलब्ध करुन द्यावी. ज्या ठिकाणी आपल्याला मोठा धोबीघाट करता येईल आणि इकडे जे होते ते २० ते २५ धोब्यांकरीता केला होता.

**रोहिदास पाटील :-**

आता तो प्रश्न राहिलेला नाही. आता प्रश्न असा आहे की, तो ठराव तुम्ही बाजूला न करता, विखंडीत न करता तुम्ही परत असा ठराव आणला, हा विषय आहे. त्यावेळी तुम्ही हे सांगितले असते की, ह्याच्यासाठी हा ठराव आदल्या सभेत आणला असता.

**बर्नड डिमेलो :-**

आपण जर खर्च केला असता तर करता आले नसते. पण आपण तिथे खर्च केलेलाच नाही.

**शरद पाटील :-**

विषय खर्चाचा पण नाही आणि विषय तिथे धोबीघाट बांधा नका बांधू. पण तुम्ही जेव्हा २०११ मध्ये हा ठराव मंजूर केलेला आहे. तो विखंडीत करा. मग करा. आम्ही बोलत नाही. तिथे...........

**मा. सभापती :-**

ठरावामध्ये आले आहे.

**शरद पाटील :-**

असे थोडी होवू शकते. नियमामध्ये उद्या जर कोणी तक्रार केली तर त्याला जबाबदार कोण?

**रोहिदास पाटील :-**

स्थायी समिती असणार.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

ऐसा विषय सदस्योंके जानकारी मे आया तो इसका विरोध हो जायेगा। लेकिन..........

**दिपक खांबित :-**

एक ठराव झाला असेल आणि त्याच विषयावर दुसरा ठराव झाला तर पहिला ठराव आपोआप रद्द होतो.

**शरद पाटील :-**

आपोआप कसा रद्द होतो.

**बर्नड डिमेलो :-**

स्थायी समितीला अधिकार आहे.

**दिपक खांबित :-**

ते ठराव स्थायी समिती करणारी आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

सचिव साहब, ऐसा पहले भी हुआ है। पहले दो प्रस्ताव आये फिर २ साल बाद नये तरीकेसे प्रस्ताव आये। ता नगरसचिव की ड्युटी बनती है की, पहले प्रस्ताव आये हुए हो तो वापस प्रस्ताव रिपीट हुए तो वह भी देखे।

**शरद पाटील :-**

याची जाणीव आम्हाला द्यायला पाहिजे.

**नगरसचिव :-**

जिन्होने प्रस्ताव दिया है उस डिपार्टमेंटका काम है। सचिव के पास डबल ठराव आया तो वह मेरा काम नही डिपार्टमेंट का काम है। उन्होने देना नही चाहिए। पहले ठराव के बाद दुसरा ठराव नही देना वह उनका काम है, मेरा नही।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

खांबित साहबने बोला ऑटोमॅटीक विखंडीत होता है। इसलीए आप बताईए कानुन क्या बोलता है।

**नगरसचिव :-**

जो ठराव किया है इसमे एक वर्डींग किया है। सदर ठराव अधिग्रहन करुन उसको अधिग्रहन किया है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

प्रशासनसे जो गोषवारा आया है वह बिना विखंडनकिए आ सकता है क्या? यह मै पुछ रहा हूॅ।

**नगरसचिव :-**

मेरे पास चेकींग नही करते है। उसमे मेरा प्रस्ताव नही रहता है। मेरा जो सभागृह है उसका कामकाज है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

उन्होने बोला ऑटोमॅटीक विखंडीत होता है।

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७६ करीता दोन ठराव आलेले आहेत. सदर दोन्ही ठराव मतदानास टाकतो. पहिला ठराव सुचक श्री. बर्नड डिमेलो आणि अनुमोदक श्री. प्रमोद सामंत आणि दुसरा ठराव सुचक श्री. शरद पाटील व अनुमोदक डॉ. राजेंद्र जैन  यांचा आहे. प्रथम मी दुसऱ्या ठरावाचे वाचन करतो. मनपा क्षेत्रातील एम.आय.डी.सी. जवळील सातकरी तलावाचे सुशोभिकरण करणेकरीता दि. २८/०८/२०१३ च्या मा. स्थायी समिती सभेमध्ये बांधकाम विभागाने आर्थिक व प्रशासकीय मंजुरीकरीता प्राप्त विषय ठेवण्यात आलेला आहे. यापूर्वी दि. २५/०५/२०११ च्या मा. स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र. २५ ने या तलावावर धोबीघाट बांधण्याचा प्रस्ताव ठेवून रु. ३५ लक्ष रक्कमेचे अंदाजपत्रकास मंजूरी घेतलेली होती.

सार्वजनिक बांधकाम विभागाने दि. २५/०५/२०११ ने स्थायी समितीमध्ये रु. ३५ लाखाचे खर्चास मंजूरी घेतलेली असताना व या ठरवाच्या अनुषंगाने खर्च झालेल्या कामाची माहिती स्थायी समिती सदस्यास देणे बंधनकारक आहे. आजच्या सभेमध्ये या तलावाचे सुशोभिकरणाचा प्रस्ताव ठेवून रु. ४० लाख खर्चाची मंजूरी मागणे संपूर्णपणे सभागृहाची दिशाभूल करणारे आहे.

दि. २५/०५/२०११ व दि. २८/०८/२०१३ या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये याच तलावावर धोबीघाट बांधणे व तलावाचे सुशोभिकरण करणे या खर्चास मंजूरी मागवून बांधकाम विभागातील अभियंत्यांनी सभागृहाची व प्रशासनाची दिशाभूल केलेली आहे.

तरी यास जबाबदार असणाऱ्या अभियंत्यावर कारवाई होणेकरीता मी ठराव मांडीत आहे. या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. आता मी पहिल्या ठरावाचे वाचन करतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरागाव येथे एम.आय.डी.सी. जवळ सातकरी तलाव असुन सदर तलावाचे सुशोभिकरण काम करावयाचे आहे. सदर तलावाच्या बाहेरील बाजुस कुंपण बांधण्यात आलेले असून आतील बाजूस देखील कुंपण भिंत बांधुन दोन्ही कुंपणभिंतीच्या मधील जागेत जॉगिंग ट्रॅक करुन इतर सुशोभिकरण काम करावयाचे आहे. सदर कामांतर्गत प्रथम टप्प्यात आतील बाजुस कुंपणभिंत बांधणे कामी रु. ४०,६३,४००/- रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर तलावात जॉगिंग ट्रॅक तयार करुन सुशोभिकरण इ. कामे सुध्दा हाती घेणे आवश्यक आहे. सदर कामी रु. ४३,६१,६००/- एवढा खर्च अपेक्षित असून सदर अंदाजपत्रकास देखील ही सभा मान्यता देत आहे. यापूर्वी सदर जागेवर धोबीघाट बांधण्याचे कामास मा. स्थायी समितीने मान्यता दिली होती. सदर ठराव अधिक्रमित करुन वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. सभापती :-**

श्री. बर्नड डिमेलो ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने ७ मतदान झालेले आहे आणि विरोधात ५, तटस्थ २ झाले. तर श्री. बर्नड डिमेला यांचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ७६ :-**

मिरा गांव सातकरी तलावाचे सुशोभिकरण कामातंर्गत कुंपणभिंत बांधणे कामाच्या खर्चास प्रशासकीय आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ७२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरागाव येथे एम.आय.डी.सी. जवळ सातकरी तलाव असुन सदर तलावाचे सुशोभिकरण काम करावयाचे आहे. सदर तलावाच्या बाहेरील बाजुस कुंपण बांधण्यात आलेले असून आतील बाजूस देखील कुंपण भिंत बांधुन दोन्ही कुंपणभिंतीच्या मधील जागेत जॉगिंग ट्रॅक करुन इतर सुशोभिकरण काम करावयाचे आहे. सदर कामांतर्गत प्रथम टप्प्यात आतील बाजुस कुंपणभिंत बांधणे कामी रु.

४०,६३,४००/- रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर तलावात जॉगिंग ट्रॅक तयार करुन सुशोभिकरण इ. कामे सुध्दा हाती घेणे आवश्यक आहे. सदर कामी रु. ४३,६१,६००/- एवढा खर्च अपेक्षित असून सदर अंदाजपत्रकास देखील ही सभा मान्यता देत आहे. यापूर्वी सदर जागेवर धोबीघाट बांधण्याचे कामास मा. स्थायी समितीने मान्यता दिली होती. सदर ठराव अधिक्रमित करुन वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

| ठरावाच्या बाजुने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|
| १) श्री. राजू भोईर<br>२) श्री. बर्नड डिमेलो<br>३) श्रीम. अनिता जयवंत पाटील<br>४) श्री. मुन्ना सिंह<br>५) श्री. प्रमोद जयराम सामंत<br>६) श्री. राजेश वेतोसकर<br>७) श्रीम. शर्मिला बगाजी | १) श्री. शरद केशव पाटील<br>२) श्री. रोहिदास पाटील<br>३) श्रीम. मिरादेवी यादव<br>४) डॉ. राजेंद्र जैन<br>५) डॉ. रमेश जैन | १) श्री. प्रविण मोरेश्वर पाटील<br>२) श्री. प्रशांत दळवी |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७७, विकास आराखडयातील व आरक्षणाच्या जागा विकसित करण्या संबंधी विषयाचा आढावा घेणे

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेब, सगळं सांगायला पाहिजे विषयावर आढावा. तर तुम्ही जर सांगितले त्याच्यावर चर्चा होईल की, आपल्याला कोणत्या विषयावर विकास आराखडा आहे. आता नविनच झालेला उत्तनचा एम.एम.आर.डी.ए. चा.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, तयारी असेल तरच ते निवेदन घ्या. नाहीतर चर्चेला असेल तर चर्चा घ्या.

**सत्यवान धनेगावे :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो. सदर विषयाच्या संदर्भात प्रशासनाचा गोषवारा सादर करण्यात आलेला नाही. तर तो स्टॅन्डीग कमिटीसमोर विषय आलेला आहे. त्या अनुषंगाने मी शॉट ब्रिफ नोट घेतो. मिरा भाईंदरच्या डेव्हलपमेंट प्लान हा दि. १४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेला आहे. आणि दि. १५/०७/१९९७ पासून अंमलात आलेला आहे. या डेव्हलपमेंट प्लानमध्ये एकूण १९ महसुली गाव आहेत आणि ७९.४ स्क्वेअर मिटर एरिया आहे. यापैकी, डोंगरी, उत्तन, पाली, चौक हे पाच गावासाठी स्पेशल प्लानिंग ॲथोरिटी म्हणून एम.एम.आर.डी.ए. ची नियुक्ती केली आणि त्या एम.एम.आर.डी.ए. ने त्या पाच गावाकरीता वेगळा प्लान तयार करुन तो प्लान मंजूरीसाठी गर्व्हमेंटकडे सबमिट केला आहे. आणि त्याला मंजुरी प्राप्त झाल्याचे कळते. निश्चित माहिती नाही. परंतु मंजूरी झाल्याचे कळते. त्या बाबतच अधिकृत नोटीफिकेशन आलेले कळत नाही. तर टोटल जे आरक्षण आहे ते ३८६ आरक्षण आहे. त्यापैकी एम.एम.आर.डी.ए. च्या गावातले प्लानिंग ॲथोरिटीचे ४६ आरक्षण आहेत. राहिलेली ३४० आरक्षण त्यापैकी ९१ आरक्षण हे सी.आर.झेड. ला बाधित होत आहे. त्यापैकी उर्वरीत राहिलेले २४९ आरक्षित शिल्लक राहिले. २४९ पैकी ३१ आरक्षण डेव्हलप झालेले आहेत आतापर्यंत. पार्टली डेव्हलॉपमेंट डॉक्युमेन्टेशन रिझर्व्हेशन २० आहेत. आणि टी.डी.आर. च्या माध्यमातून आपल्याला आतापर्यंत ६० आरक्षण ताब्यात आलेले आहेत. अविकसित किंवा न मिळालेले आरक्षण १२३ आहेत. याबाबतचा डिटेल अहवाल आढावा घेण्याचे काम आमच्या डिपार्टमेंटकडून चालू आहे. हे मागच्या ४-५ महिन्याच पोजिशन आहे. विषय आला म्हणून मी शॉर्ट टिपणी दिली.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय, मला असे म्हणायचे आहे की, आज आपण इकडे विषय घेतला विकास आराखड्यातील आरक्षणाच्या जागा विकसित करण्यासंबंधी विषयाचा आढावा बैठक आहे. या आढावा बैठकीस अशा प्रकारचे निवेदन करणे कसे शक्य आहे. आज मला सांगा आपण आज मनपाच्या विकास आराखड्याच्या जागा आहेत. या एकूण किती जागा आहेत? आणि मनपाने किती घेतलेल्या आहेत? ह्याबद्दल सगळी माहिती द्या ना.

**सत्यवान धनेगावे :-**

देवू ना. गोषवारा विभागाने दिलेला नाही. विषय आला म्हणून मी सांगितल.

**प्रमोद सामंत :-**

विषय आला तर गोषवारा हा आला पाहिजे ना.

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेब, मला बोलु द्या. काका, हा विषय घेण्याच कारण अस आहे की, त्या त्रृटी आणि चूका काढण्यापेक्षा शहरामध्ये स्वच्छ आणि सुंदर शहर आपल्याला बनवायच आहे. आज जो त्यांनी विषय पुढे ठेवला आहे. प्रत्येक सदस्यांनी आपआपल्या शहरामध्ये काय केल पाहिजे, कुठे आरक्षण आहे आणि तिथे काय-काय झाल पाहिजे? आपल्याकडे निधी किती आहे आणि ते आपण करु शकतो का? केंद्राकडून आणि राज्याकडून आपल्याला किती निधी भेटू शकेल. या विषयावर चर्चा करण्यासाठी हा विषय घेतलेला आहे. डोबल याच्यावर चर्चा करणे येणाऱ्या मिटींगमध्ये ते सविस्तर आणतील. कोणत पहिल घेतल पाहिजे, कोणत नंतर घेतल पाहिजे. उत्तन हा आपल्या मिरा भाईंदरचा काही भाग आहे. तो एम.एम.आर.डी.ए., एम.पी.डी.सी. मध्ये गेलेला आहे. त्यामध्ये आपण काय केल पाहिजे आणि कोणत्या प्रकारे लाभ घेतला पाहिजे. या विषयावर दिलखुलास चर्चा करा. आणि नंतर येणाऱ्या मिटींगमध्ये सविस्तर विषय घेऊ या. चर्चा करायला काय हरकत आहे. त्रृटी काढू नका. अधिकाऱ्याने हे काय केल ते काय केल?

**प्रशांत दळवी :-**

त्यावेळेला ज्या आराखड्यामध्ये आपण जागा विकसित करणार आहोत. त्या जागा पहिल्या आपण मनपाने हस्तांतरीत करुन घेतल्या का? त्याची सविस्तर यादी द्या. जेणेकरुन काय होईल की, शितलनगर, शांतीपार्क आणि शांतीनगर या ठिकाणच्या ज्या आर.जी. जागा आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

शितलनगर, शांतीपार्क, शांतीनगर यांच्या व्यतिरिक्त पण एरिया आहे.

**प्रशांत दळवी :-**

मी माझ्या मिरारोड विभागामार्फत बोलतो. बाकी सदस्य पण बोलतील. परंतु, त्या ठिकाणी काय झाले की, आज शांती स्टार बिल्डरची जी काय आर.जी. जागा आहे त्या जागा या गुंड्यामार्फत ज्या जागेचा कबजा घेतलेला आहे. त्या ठिकाणी ओपन हॉटेल्स् चालु केलेले आहेत. त्या तिकडच्या सोसायट्यांची पत्र आयुक्तांच्या नावाने आम्ही दिलेली आहे. जेव्हा शासनाचा जी.आर. आला होता की, ह्या सगळ्या आर.जी. जागा ताब्यात घ्याव्यात.

**बर्नड डिमेलो :-**

दळवी साहेब तुम्ही बोलता ते आपल्या भल्यासाठीच आहे. त्यांनी जो विषय आणला तो ह्याच कारणावरुन आणला आहे. तुमचच काय, आमच्या उत्तनच असो, शहराच्या कानाकोपऱ्यात ज्या जागा आहे त्याच्यावर चर्चा विचार विनिमय करुन आपण काय केल पाहिजे त्यासाठी हा विषय आणला आहे. आपण फक्त एका विशिष्ट भागाचा की, विशिष्ट प्रभागाची चर्चा नाही. म्हणून आजच्या विषयावर चर्चा करुया. तुम्हाला ज्या काही सुचना आहेत त्या सुचना घ्या. सविस्तर कोणत्या आरक्षणावर आपण काय करायच तरच ते पुढच्या विषयामध्ये घेतील की नक्की घ्यायच कोणत?

**प्रविण पाटील :-**

साहेब तुम्हाला एक विनंती आहे की, जो एम.एम.आर.डी.ए. चा प्लान आहे त्याची कॉपी आम्हाला द्या.

**सत्यवान धनेगावे :-**

एम.एम.आर.डी.ए. च्या प्लानची कॉपी एम.एम.आर.डी.ए. कडून मिळणार. माझ्याकडून नाही.

**प्रविण पाटील :-**

आपल्याकडून नाही मिळणार. मग, आम्हाला प्लान कसा समझणार.

**सत्यवान धनेगावे :-**

माझ्याकडे जे आहे त्याची झेरॉक्स कॉपी काढुन देतो.

**प्रशांत दळवी :-**

आपल्या विकास आराखड्यामध्ये एकूण किती जागा आहे? आपण एकूण किती ताब्यामध्ये घेतल्या? किती घ्यायच्या आहेत? ही सगळी माहिती आपण द्यावी.

**सत्यवान धनेगावे :-**

देतो ना.

**प्रमोद सामंत :-**

त्यांनी आता सांगितल्या काही गोष्टी त्या परत एकदा रिपिट करा. ३४० आरक्षण आहेत.

**प्रशांत दळवी :-**

पण, आम्हाला त्याची यादी पाहिजे.

**सत्यवान धनेगावे :-**

ज्यावेळी विषय येईल त्यावेळी गोषवारा आम्ही राईटींगमध्ये देऊ.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. पुढच्या मिटींगमध्ये साहेब देतील.

**रोहिदास पाटील :-**

आरक्षणाचा विषय निघाला ह्या दिवशी आयुक्त साहेब होते. साहेब तुम्ही पण होते. त्यांनी निवेदन केल होत, तुम्ही निवेदन केल होत. आरक्षण क्र. १०२ च आम्ही फक्त विनंती केली होती की १० X १५ चा बोर्ड लावा. तर काय झाल? अडचण काय आहे? तुम्ही सांगितले दुसर एक्जीक्युर काम करत नाही का? किंवा तुम्ही कोणाला सांगितलच नाही का? किंवा ते अस म्हणतील की, आम्हाला ऑर्डर द्या.

**प्रमोद सामंत :-**

इंटर डिपार्टमेंटला होत नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

आपला आग्रह हा मोठ्या साईजच्या बोर्ड बद्दल आहे. जागेवरती छोट्या साईजचा बोर्ड हा विकासकाने लावला आहे.

**रोहिदास पाटील :-**

माझा आग्रह स्पष्ट आहे की, महापालिकेच ते आरक्षण आहे. ते सगळ्या लोकांना दिसल पाहिजे. विकासकाची आम्हाला पर्वाच नाही. विकासक कोण आहे? विकासक महापालिका चालवते का?

**सत्यवान धनेगावे :-**

विकासक महापालिका चालवते अस आम्ही म्हटलं नाही. जे लावल ते सांगितल.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, २००६ चा आदेश आहे की, विकासकाने डेव्हलप करणे, ही प्रॉपर्टी आपली आहे. स्थायी समितीने तुम्हाला १५ लाखाची मंजुरी दिले. आपला बोर्ड का लागत नाही. आम जनतेला माहित पाहिजे. आरक्षण क्र. १०२ आहे. बगिचा आहे, क्षेत्र एवढ आहे, सर्व्हे नंबर हा आहे, हिस्सा नंबर हा आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

अस असेल तर पॉलिसी डिसीजन घ्यायच. महापालिका क्षेत्रात जेवढे आरक्षण आहे तेवढे बोर्ड लावण्याच धोरण घ्या.

**रोहिदास पाटील :-**

घ्याना. मा. सभापती साहेब, आम्ही १०२ च्या आरक्षणाचा आग्रह धरतो तर त्याला काही अडचण आहे का ते सांगा. असेल तर त्याने बोलाव तस रुलिंग द्या.

**बर्नड डिमेलो :-**

काका, ते टोटल प्रॉपर्टी सांगतात महापालिकेच्या जेवढ्या प्रॉपर्टी आहे तिथेच फक्त विशिष्ट एका प्लॉटला............

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही काय करायच ते नंतर करा. आम्ही आग्रह करतो त्याच किती दिवसात लागेल त्याच उत्तर द्या. जागा महापालिकेच्या ताब्यात तो बिल्डर देणार नाही. ओस्तवाल बिल्डर आहे तो देणार नाही हे मी तुम्हाला सांगतो.

**सत्यवान धनेगावे :-**

द्यावच लागेल ना. नोटीफीकेशन आहे कंडीशन आहे. त्याला द्यावच लागेल त्याशिवाय परवानगी मिळणार नाही.

**मा. सभापती :-**

आपल्याला बोर्ड लावायला काय हरकत आहे.

**अनिता पाटील :-**

सर, अशा आरक्षणाला तरी बोर्ड लावू द्या. आमच्याकडे प्रभाग क्र. ४० मध्ये पण आहे. आणि आता आरक्षणाचा विषय निघालेलाच आहे. मागच्या मिटींगमध्ये मी म्हटलेल की, आमच्या इथे ३५ बगिचेच आरक्षण आहे तिथे अतिक्रमण झालेल आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, २००६ च्या नोटिफिकेशनने नगरविकासच आपल्याला पत्र आहे. ही जागा विकासकाला ५० टक्के आरझोन आणि ५० टक्के बगिचा. बगिचा हा विकासकाने विकसित करुन आपल्याला द्यायचा आहे. बगिचा विकासकाने २००६ पासून २०१३ पर्यंत दिलेला नाही. आजुबाजूला राहणाऱ्या लोकांना त्याची सुविधा मिळत नाही. तो अजुन २०१३ पर्यंत पण विकसित करणार नाही. आपण लोकांना वंचित ठेवायच का? महापालिकेच अस्तित्व आहे तो करत नसेल. महापालिका करु शकेल. जे पैसे खर्च होतील, तो ज्या दिवशी मागायला येईल व्याजासहित, दंडासहित वसुल करा अशी महापालिकेची भुमिका असली पाहिजे. तर ते सगळे विकासक वठणीवर येतील. विकासकाला अस वाटते की, महापालिका आमच्या खिशात आहे.

**मा. सभापती :-**

साहेब, ह्याच्यावर प्लान मंजूर झालेला आहे का?

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, तो प्लान देणारच नाही. हा मार्केटचा एरिया आहे. जर ते लेट होईल तितकी त्याची किंमत वाढेल.

**सत्यवान धनेगावे :-**

त्यांनी प्रपोजल टाकलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

आरक्षण आपली जागा त्याच्यात सगळे चरशी बसतात.

**सत्यवान धनेगावे :-**

जागा प्रायव्हेट आहे. आपली जागा नाही.

**रोहिदास पाटील :-**

जागा प्रायव्हेट आहे. आपल आरक्षण आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

आरक्षण महापालिकेच आहे.

**रोहिदास पाटील :-**

त्याच्यावर महापालिकेच रेकॉर्ड आहे?

**सत्यवान धनेगावे :-**

हो त्यांनी प्लान पासचा प्रस्ताव टाकलेला आहे. पहिल्यांदा आपण आपली जागा डिमारटेड करुन घेऊ. नंतर आपण हँडओवर करूनच परमिशन त्याला देणार. आपण जस बोलता तस एकदम मोकळ सोडणार नाही विकासकाला.

**रोहिदास पाटील :-**

समजा, आपला १० X १५ चा बोर्ड तुम्ही आज लावला तो कायदेशिर काय करणार आहे?

**सत्यवान धनेगावे :-**

बोर्डाच ठिक आहे. पण बाकीचे आपले आरोप चुकीचे आहे.

**अनिता पाटील :-**

मा. सभापती साहेब, आता आरक्षणाचा विषय निघालेलाच आहे. माझ्या वॉर्डच मी कमिशनर साहेबांशी बोललेली आहे की, ३५३ बगीचाच आरक्षण आहे. तिथे अतिक्रमण झालेले आहे आणि तिकडचे अर्धे अतिक्रमण काढले आहे आणि अर्धे अतिक्रमण आहे. माझी अशी मागणी आहे की, निदान त्या जागेवर आपले वॉल कंपाऊंड तरी टाकले तर पुढचे अतिक्रमण होणार नाही. अतिक्रमण झाल्यानंतर काढण्यासाठी त्याला २ महिन्यात अर्धे काढणार, अर्धे होणार. त्यापेक्षा तिथे वॉल कंपाऊंड तरी टाकून घ्या. तुम्ही हस्तांतरीत शासनाकडून करु तेव्हा करु. पण सध्या ते तरी करा.

**सत्यवान धनेगावे :-**

साहेबांकडे मागे विषय निघालेला. त्यावेळी ठरलेली की, ती जागा मान्यता प्रस्ताव करणेसाठी सुचना दिलेल्या आहेत. तर लवकर प्रस्ताव आम्ही सबमिट करुन घेवू आणि कामाला चालू करु.

**अनिता पाटील :-**

तोपर्यंत वॉल कंपाऊंड तरी टाकले तरी अतिक्रमण करणारी लोक थांबतील ना.

**सत्यवान धनेगावे :-**

झालेली अतिक्रमणे तोडली ना.

**अनिता पाटील :-**

अर्धे तोडले अर्धे आहे आणि भरपुर अतिक्रमण हळूहळू पुढे चाललेले आहे ना. ४ बांधले की १ तुटले जाते आणि ३ तसेच ठेवतात.

**सत्यवान धनेगावे :-**

तिथे नगर झालेले आहे.

**अनिता पाटील :-**

ते आरक्षणामुळे नाही. आरक्षणाची जागा मोकळी आहे. फक्त २ रुमच अतिक्रमण झालेले आहे. ती पूर्ण जागा मोकळी आहे. ४ एकर जागा पुर्ण मोकळी आहे.

**प्रमोद सामंत :-**

धनेगावे साहेब बोलले नगर स्थापन झालेले आहे. म्हणजे त्यांना माहिती असताना.

**सत्यवान धनेगावे :-**

ते आपल्याला पण माहिती आहे.

**प्रमोद सामंत :-**

आपण प्रशासन तिथे कोणतीच कारवाई करत नाही. ही फार दुःखाची गोष्ट आहे.

**अनिता पाटील :-**

धनगावे साहेब, तुमच्या माहितीसाठी सांगते जे आरक्षण आहे ती जागा पुर्ण सपाट आहे. तिथे चाळी झाल्या सांगतात पण तिथे चाळी झाल्या नाहीत. तिथे २ रुम झालेले आहेत आणि त्याची माहिती मी तुम्हांला लगेच दिलेली आहे. मग आहे ती जागा आपण वॉल कंपाऊंड टाकून ताब्यात घेण्यात यावी.

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही आता सांगितले की, ९७ मध्ये डी.पी.आर. प्लान मंजूर झाला. आता ज्या मालकाच्या जमिनी आहे. किती वर्षाचा कालावधी असतो जर महापालिकेने काहीच केले नाही, ती जागा हस्तांतरीत केली नाही किंवा तो जो जागा मालक आहे तो मागू शकतो. २०१७ ला आपली मुदत संपते असे मला माझ्या माहितीप्रमाणे माहित आहे. २०१७ पर्यंत पालिकेने जर त्या जागेवर काहीच केले नाही, ज्या मालकाची जमिन आहे तो जागा परत मागू शकतो. एवढ्या वर्षात तुम्ही काहीच करु शकले नाहीत. ती जमिन आमची आम्हाला परत द्या.

**सत्यवान धनेगावे :-**

सर्वसाधारण धोरण त्यामध्ये नाही.

**बर्नड डिमेलो :-**

बघावे ते, नाहीतर आपण काही करु शकलो नाही एवढी मोठी महापालिका राज्यामध्ये मोठे नाव निघते आणि जर जमिनी आपण डेव्हलप करु शकलो नाही तर असे काय कायद्यात आहे तसे होता कामा नये. आता जो विषय आलेला आहे त्या विषयावर चर्चा करा आणि लवकरात लवकर अधिकारी वर्ग पैसा जमा करण्याच्या मागे लागत नाही आणि विकासाचे विषय येतात. तर करायचे कुठून? आयुक्त साहेब, विकासाचे विषय येतात, वसुली होत नाही, पैसा जमा होत नाही. नगरसेवक सगळे आपआपल्या परिने पत्रव्यवहार करतात, सगळ्या मागण्या करतात. पण कोणाच्या मागण्या पूर्ण होत नाहीत. थातुरमातूर पेव्हर ब्लॉक, रस्ते, खड्डे, नाले, गटार एवढेच होते. पुढच्या वर्षी तेच बांधले. गणपती बाप्पा येतो तसे दरवर्षी रस्ते पण दरवर्षी सर्व गोष्टी. मला तर वाटते त्या गोष्टी सोडून पूर्ण शहराच्या विकासासाठी काहीतरी पाऊल उचलले पाहिजे. हा जो विषय आला ह्याच्यावर मला तरी वाटते की, तुम्ही चर्चा करा आणि कुठे-कुठे काय केले पाहिजे. जागा परत त्या जागा मालकाला जावू नये आणि शहरामध्ये नागरीकांना प्रत्येक सुविधा मिळाव्यात आणि पर्यटक बघण्यासाठी बाहेरच्या राज्यातून यावेत. अशा काहीतरी योजना राबवून घ्या. तुम्ही स्थायी समितीवर आहात आणि मला वाटते, फार जाणकार आणि विचारी लोक आहेत. फेरिवाले, गटार, गल्ली, पेव्हर ब्लॉक, रस्ते ह्या गोष्टी थोड्याशा बाजूला ठेवा. त्या पण गरजेच्या गोष्टी आहेत, झाल्याच पाहिजे. विकासावर मला वाटते सर्वपक्षीय एकत्र बैठक झाली आणि चर्चा झाल्यावर शहराचा विकास व्हायला विलंब लागणार नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

ज्यावेळी विषय येईल त्यावेळी मी पूर्ण माहिती देतो.

**बर्नड डिमेलो :-**

आता आपल्याला सांगा, लवकरात लवकर नागरीकांसाठी शहरामध्ये कोणकोणत्या गोष्टी केल्या पाहिजे. जमिनी आहेत त्या.

**सत्यवान धनेगावे :-**

नागरीकांसाठी आपण गार्डन ताब्यात घेतले आहे ते डेव्हलप केले पाहिजेत. प्ले ग्राऊंड घेतले ते डेव्हलप केले पाहिजे. ड्रामा थिएटर विकसित करण्यासाठी प्रशासनाने २००३ पासून ते आतापर्यंत ३ वेळेस विषय दिला होता. मा. महासभेला एकदाही विषय मंजूर होऊ शकला नाही. प्रशासन एकदम क्रियाशिल आहे.

**बर्नड डिमेलो :-**

दोन-दोन विषय ह्याच्यावर घ्या किंवा महासभेवर घ्या.

**प्रमोद सामंत :-**

साहेब, एका बाजूला तुम्ही सांगता की, प्रशासन क्रियाशिल आहे म्हणून आणि एका बाजूला तुम्ही स्टॅन्डींगच्या सभेत सांगता की, आरक्षणाच्या जागेवर नगर वसले आहे. तर कुठे क्रियाशिल आहेत? तुम्हाला माहित आहे तर कारवाई करा.

**सत्यवान धनेगावे :-**

मागच्या १५ वर्षापासून वसलेले आहे.

**प्रमोद सामंत :-**

नाही. १५ वर्षापासून वसलेले आहे तर तिथे सांगा. पेपरवरती घ्या की, ह्या आरक्षणावर असे असे अतिक्रमण झालेले आहे आणि त्यावर कारवाई करा. तुम्ही इंटर डिपार्टमेंट करस्पॉन्डन्स करुन त्या डिपार्टमेंटला लिहा की हे आमचे आरक्षण आहे आणि आमच्या आरक्षणात अशा अशाप्रकारे अतिक्रमण झालेले आहे ते त्वरीत काढण्यात यावे असे तुम्ही कुठे लिहले आहे का? मेन्शन केले आहे का?

**सत्यवान धनेगावे :-**

होत नसेल तर आपली मदत घेऊ ना.

**प्रमोद सामंत :-**

आम्ही असणार नसणार माहित नाही, तुम्ही इथेच असणार. तर तुम्हि असे कुठले पेपरवर्क आणले असेल तर आम्हाला दाखवा. ह्या ह्या आरक्षणात असे असे अतिक्रमण गेल्या १५ वर्षापासून झालेले आहे, तर ते काढून टाकण्यात यावे. असे कुठे पेपरवरती घेतले असेल तर आम्हाला ते दाखवा.

**सत्यवान धनेगावे :-**

मा. आयुक्तांच्या मंजूरीने गोषवारा स्टॅन्डीग कमिटीला देण्यात येईल. त्यानंतर पूर्ण डिटेल पण देण्यात येईल.

**प्रमोद सामंत :-**

साहेब, गोषवारा पण द्या आणि अशा महापालिकेच्या कुठल्या कुठल्या आरक्षणात किती अतिक्रमणे झालेली आहेत, कित्येक वर्षापासून आहे ते पण त्या गोषवाऱ्यामध्ये नमुद करावे.

**सत्यवान धनेगावे :-**

ऑलरेडी एक पिटीशन हायकोर्टात चालु आहे. त्यामध्ये पूर्ण शहराच्या आरक्षणाचे बांधकाम झालेले आहे. त्याचा सर्व रिपोर्ट ऑलरेडी हाय कोर्टाला ॲफिडेव्हीट सबमिटी केलेले आहे आणि ॲफिडेव्हीट ची कॉपी सगळ्यांना देवू.

**प्रमोद सामंत :-**

साहेब, आता आमचे बर्नड साहेब बोलले. विकास आराखडा १९९७ मध्ये आलेला आहे. मंजूर नंतर ३-४ वर्षांनी झाला. तर ते १९९७ आणि आता २०१७ पुढच्या ४ वर्षात २० वर्षे राबलेले ती आरक्षण ताब्यात घ्यायची असे काहीतरी असावे. तर पुढच्या ४ वर्षात उरलेली १५०-२०० आरक्षणे जी शिल्लक आहेत ते आपण घेवू शकतो का?

**सत्यवान धनेगावे :-**

ती लिस्ट आपण सभागृहात डिसाईड करु आणि ती आरक्षण घेवू शकतो.

**प्रमोद सामंत :-**

मग, त्याची प्रोव्हीजन आपण काय करणार? त्यामागे आपली पॉलीसी काय आहे ते पण गोषवाऱ्यामध्ये द्या. तुमचे रोजचे त्याबाबत डिस्कशन असेल, तुमचा विभाग आहे. त्यामुळे पुढच्या गोषवाऱ्यात त्या असाव्यात असे आम्हाला वाटते आणि पुढच्या मिटींगमध्ये आमचा हा विषय असणार आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

पुढची मिटींग नाही. कारण माहिती तयार करायला २ ते ३ आठवडे लागतील.

**प्रमोद सामंत :-**

साहेब, तुमच्याकडे तयार असेल माहिती. कशाला २ ते ३ आठवडे लागणार.

**सत्यवान धनेगावे :-**

लागणार.

**(विकास आराखडयातील व आरक्षणाच्या जागा विकसित करण्या संबंधी विषयाचा आढावा घेण्यात आला.)**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७८, मिरा-भाईंदर क्षेत्रातील रस्त्यावर वारंवार खडे पडणाऱ्या रस्त्यांचे मजबुतीकरण करणे बाबत निर्णय घेणे.

**प्रमोद सामंत :-**

खांबित साहेब, आयुक्त साहेबांनी त्या दिवशी निवेदन केलेले की, ३१ तारखेच्या अगोदर आपण शहरातले सर्व खड्डे बुजवणार आहोत. तर आज २८ तारीख आहे. २-३ दिवस उरलेले आहेत. मला वाटते शहरामध्ये अजुनही सगळीकडे खड्डे दिसत आहेत. ज्या ज्या लोकांनी काम केले, एस.पी.एम.एल. ने केले. बांधकाम विभागाने केले, तर काम अजूनही कुठेही पूर्ण नाही. तर जरा सविस्तर माहिती आम्हाला द्या की, एक्झॅक्टली किती परसेन्ट काम झालेले आहे आणि किती परसेन्ट काम शिल्लक आहे?

**दिपक खांबित :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, आपले मिरा भाईंदर महानगर क्षेत्र जे आहे ते ७९.४० चौ.कि. आहे आणि आपल्याकडे एकूण २२७ कि.मी. चे डांबरी रस्ते आहेत आणि १६० कि.मी. च्या कॉंक्रिट पायवाटा आहेत. गावामधले ज्या पायवाटा आहेत एवढ्या सगळ्या रस्त्याच आपल्याकडे जाळ आहे. आणि आपल्याच रस्त्यावरुन पाणी पुरवठ्याच्या जलवाहिन्या आता सिव्हरेज लाईन, विद्युत पुरवठा करणाऱ्या रिलायन्सच्या केबल, टाटाच्या केबल, महानगर गॅसच्या गॅसलाईन विविध इंटरनेट कंपन्या पुरवठा करणाऱ्याच्या फायबर ऑप्टीक केबल, एम.टी.एन.एल. च्या केबल ह्या सगळ्यांच जाळ हे रस्त्यावरुन पसरलेल आहे. आणि ह्या सुध्दा सार्वजनिक सुविधा असल्याने त्यांना आपल्याला रस्ते खोदाई करणे करीता म्हणजे नविन केबल टाकणे, फॉल्ट काढणे या करिता वारंवार परवानग्या द्याव्या लागतात. त्याकरिता ते आपल्याकडे पैसे जमा करतात. आणि हे जे खोदलेले रस्ते आहेत ते दुरुस्त करण्याकरिता महानगरपालिका दरवर्षी विभागवार म्हणजे प्रभागवार ठेकेदारांची नियुक्ती करते. त्याप्रमाणे चालु वर्ष सुध्दा ठेकेदारांची नियुक्ती केलेली आहे. ठेकेदारांचा जो सुरक्षा पिरेड असतो म्हणजे डिफेक्टलायबल पिरेड ते काम पूर्ण झाल्यावरती दोन वर्षाच्या आत जर त्या रस्त्यावर खड्डा पडला काय झाल तर ते ठेकेदारानेच करुन द्यायच आहे. त्याप्रमाणे आपण कारवाई करतो. मागच्या मिटींगला आयुक्त साहेब, आले होते

तेव्हा विषय झाला होता. त्याप्रमाणे आम्ही सर्व रस्त्यांची काम ही सुरु केलेली आहे विभागावर आणि जवळ जवळ ग्रांटिंगच्या लेवल पर्यंतची काम पूर्ण झालेली आहे. फक्त जी डांबरीकरणची काम आहे. मोठे पॅचेस आहे ते आम्ही केलेले नाही. कारण, आता दोन तीन दिवस आधी पाऊस थांबला आहे. त्यामध्ये छोटे छोटे जे खड्डे आहे ते आम्ही केलेले आहेत. कारण गॅरेन्टी पिरेड असतो. त्यामध्ये कोणी पावसात काम केल ते पूर्ण निघून जात आणि आता जवळ-जवळ ८० ते ९० टक्के जी काम आहेत डब्ल्यू आणि ग्रांटिंगची पूर्ण झालेली आहे. फक्त डांबरीकरणाची काम पेंडींग आहे. जे मोठे-मोठे पॅचेस आहेत ते पेंडींग आहे. लहान-लहान सगळी कामे करायला घेतलेली आहेत. ह्याच्यामध्ये सिव्हरेज डिपार्टमेंट जे रस्ते खोदलेले आहेत ते त्यांच्यामार्फत ती काम ही सिव्हरेज डिपार्टमेंटमार्फत करण्यात येतात. आणि जे रस्ते सिव्हरेज डिपार्टमेंटने पूर्ण केले दोन वर्षापूर्वी केलेले आहेत. ते रस्ते आता बांधकाम विभागातर्फे पूर्ण करण्यात येत आहे. अशी ही आजची स्थिती आहे.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय आपल्या परवानगीने बोलतो, आपण मध्यंतरी दिड महिन्यापूर्वी आयुक्त साहेबांशी भेट घेतली होती. आणि स्टँडिंगच्या बजेटमध्ये पण अशी चर्चा झालेली की, काही रस्त्यांच नुतनीकरण करण्यात याव. नविन रस्ते बांधण्यात यावे. २००६ ला ज्यावेळी शांती स्टार बिल्डरने हस्तांतरीत केल. त्याच्या १०-१५ वर्ष अगोदर त्यांनी तो बनवलेला रस्ता आजपर्यंत तिथे एकही नविन रस्ता घेतला का? नाही घेतलेला आहे माझ्या माहितीप्रमाणे. आज साहेब त्या शांतीनगरला २ नंबरला वसाहतीमध्ये ७५० इमारती आहे. ११ सेक्टर आहे. गिनिज वर्ड रेकॉर्डमध्ये त्याची नोंद आहे. अस असताना त्या सेक्टरमध्ये एकमेव शांती स्टारने बांधलेली पहिली ते दहावी पर्यंतची शाळा आहे. त्या इंटरनलचा रोड तुम्ही बघाल तर त्या रोडवर तुम्ही चालु शकणार नाही अशी परिस्थिती आहे. गेल्या दहा वर्षात तिकडे पॅचवर्क झालेल नाही. नविन रस्ते तर सोडाच. परंतु, अशी आपण तरतुद केली त्यानुसार आयुक्तांना आपण सगळे सदस्य जाऊन भेटलो. त्यावेळेला आयुक्त साहेबांशी खांबित साहेबांशी चर्चा देखील केली असेल. परंतु, आजमितीस त्या रस्त्याच साध डांबरीकरण, खडीकरण कुठलही प्रकारच म्हणजे त्या शाळेतले विद्यार्थी त्या रस्त्यावरुन ये-जा करतात.

**दिपक खांबित :-**

सर, ह्याबाबत खुलासा करतो. ॲक्चुअली आज जो विषय आहे. तो विषय बघितला तर मजबुतीकरण रस्त्याचा विषय आलेला आहे. कुठलेही डांबरी रस्ते असतात ते पाच ते सात वर्षांनी पुर्नःपृष्ठीकरण करावे लागतात. ते वारंवार खोदण्यात येतो तेव्हा डांबर असते खडी असते. ती एक लेव्हल नसते त्यामुळे कुठलेही डांबरी रस्ते जे असतात त्याच ५ ते ७ वर्षांनी पुर्नःपृष्ठीकरण होण गरजेच आहे. आपल्या महानगरपालिका क्षेत्रामध्ये जे काही रस्ते आहेत. बरेचसे रस्ते असे आहे की १५ ते २० वर्षात पुर्नःपृष्ठीरकरण झालेल नाही. कारण आपल्याकडे तेवढा बजेट नसतो. तर ह्या करिता मा. आयुक्त साहेबांनी आम्हाला एक आदेश दिला आहे की, तुम्ही जे असे काही रस्ते आहे त्याच इस्टीमेट करा आणि सादर करा. त्याप्रमाणे आम्ही जवळ-जवळ शहरातले ४० रस्ते जे आहे त्यांचे आम्ही असे इस्टीमेट केले. ते रस्ते कसे आहेत तिथे पुर्नःपृष्ठीकरण करायला पाहिजे. खोदुन किंवा लेव्हल करुन उंच ही व्हायला नाही पाहिजे. काही ठिकाणी अशी परिस्थिती आहे. तर अस जवळ-जवळ ६५ ते ७० कोटीचा हा खर्च आहे. त्याचा आम्ही प्रोजेक्ट रिपोर्ट तयार केलेला आहे. आणि तो आम्ही आता सादर करतो.

**रोहिदास पाटील :-**

आज सभेला हा विषय आणलेला आहे. ह्यात आम्ही काय समजायच आणि काय बोलायच? आम्ही ह्याला मान्यता द्यायची की, समजुन घ्यायच?

**मा. सभापती :-**

हा ठरावाचा विषय नाही.

**प्रशांत दळवी :-**

काका, हा ठरावाचा विषय नाही. चर्चेचा विषय आहे. खांबित साहेब आपण बोलतात बरोबर आहे. वस्तुस्थिती आहे. गेले १०-१५ वर्षापासुन रस्ते तयार झालेले नाही. ७ वर्ष त्या रस्त्यांची मुदत असते. मग, आपण जे ६०-६५ रस्ते सुचवलेले आहे. त्यामध्ये सेक्टर क्र. २ शांतीनगर जे माझ्या वॉर्डमध्ये येते त्याठिकाणी शाळा आहे. तर त्या रस्त्याची नोंद आहे का? आणि ते लवकरात लवकर होणार आहे का?

**दिपक खांबित :-**

आहे. शांतीनगरमधल्या सगळ्या रस्त्यांची जवळ-जवळ नोंद आहे. कारण ते रस्ते जे आहे ते २० वर्षापूर्वीचे आहे.

**प्रशांत दळवी :-**

साहेब, मंजुरीसाठी किती कालावधी लागणार आहे?

**दिपक खांबित :-**

माझ तर अस म्हणन आहे की, आपल्या इथे सिवरेज लाईन झाली, गॅसलाईन झाली, केबल लाईन झाली. आता रस्त्याचे जे प्रमुख रस्ते आहे त्याच आपण कॉँक्रीटीकरण करायला पाहिजे. कारण, कॉँक्रीट रस्त्याची गॅरेन्टी ही ५० वर्षाची असते. आणि त्या प्रमाणे आपण कन्सल्टंट पण अपॉईंट केले. ज्याच्याकडून आपण इस्टीमेट करुन

घेऊ. आणि आता जे.एन.एन.यु.आर.एम. ची विविध योजना येते, शासनाची विविध योजना येते. त्याच्यामध्ये हे सगळे प्रस्ताव टाकू.

**प्रशांत दळवी :-**

ते सगळ होईल. परंतु, त्याला कालावधी लागणार आहे. पण आता जे आपण म्हटल आपण जे पूटअप केलेल आहे. तर आपल्या माहिती प्रमाणे ते किती दिवसात कार्यान्वित होईल त्या ठिकाणी?

**दिपक खांबित :-**

पण जे रस्ते खुपच खराब आहे त्याच आम्ही मजबुती करणाच यंदा काम घेतलेल आहे.

**प्रशांत दळवी :-**

तो पर्यंत त्याला काही पर्यायी व्यवस्था आहे का?

**दिपक खांबित :-**

तुमच सेक्टर कुठल आहे?

**प्रशांत दळवी :-**

सेक्टर दोन आहे.

**दिपक खांबित :-**

सेक्टर दोनचा जो रस्ता आहे ना त्याला कमिशनर साहेबांनी चार दिवसांपूर्वीच मंजूरी दिली. २० लाखाच त्याच इस्टीमेट आहे. आणि त्याला मंजूरी दिलेली आहे.

**प्रशांत दळवी :-**

एक आणि चारच्यामध्ये जो रस्ता आहे. त्याला मंजुरी दिलेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे परंतु, शाळेकडचा इंटरनल रस्ता जो सांगतो. त्या विषयावर मी सभापती साहेबांना घेऊन कमिशनर साहेबांकडे गेलो होतो. तर त्याची फार बिकट परिस्थिती आहे. साहेब, तुम्ही पण एकदा व्हिजिट करा आणि तोही प्रश्न तो ही रस्ता ह्या ६५ रस्त्यांमध्ये घेण्यात यावा. अशी मी सुचना करतो.

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेब, रस्त्याची जी कामे चालु आहे. मला तर वाटते स्थायी समितीने शहराचा दौरा करावा. कुठे काय केल पाहिजे कुठल्या प्रकारे झाला पाहिजे.

**प्रशांत दळवी :-**

खांबित साहेब, तो रस्ता त्यामध्ये इन्क्लूड करावा. दुसरी गोष्ट आपण जे साहेबांकडे पूटअप करणार आहे. तर सर्व सदस्यांना माझी विनंती आहे की, आपण पुढाकार घेऊन आयुक्तांची भेट घेऊन हा मार्ग तडीस न्यावा.

**राजेंद्र जैन :-**

अभी जो काम पुरा हुआ है, भाईंदर में पॅचवर्क का वह अच्छा हुआ है। लेकिन इसमे विषय यह है की, वहाँपर खोदाई बिलकुल भी नही कर रहे है। और सडक की हाईट बढ रही है। और जो इस्टीमेट मुझे मालुम पडा उसमें एस्केलेशन का वापस इस्टीमेट डाला हुआ है। खोदाई करना है तो उसमें एस्केलेशन का कॉलम क्यों डाला? अभी एम.बी. बूक का डेटा एन्ट्री होती नही। अभी हम बोलते है की, ६ महिने बाद हम एम.बी.बूक का एन्ट्री देखेंगे उसमे एस्केलेशन का बोलेंगे नही साहब किया था।

**दिपक खांबित :-**

नही साहेब जहाँपर रस्ता उठाकर कर रहे है वहाँ पर खोदाई नहीं होती।

**राजेंद्र जैन :-**

आपका ९९ टक्का खोदाई कही नही हो रही है। और जहाँ-जहाँ छोटे छोटे आपको बोला खोदके इसको लेव्हल करो तो बोला इतना छोटा काम हो नही पाएगा। यानी की १०० टक्का खोदाई नही हो रही है। मेरा यह बोलना है की, ९९ टक्का काम नही हो रहा है। तो वह सब कॉलम हटा दो और जो होता है उसमें डाल दोना। अभी आपका इंजिनिअर क्या बोलता है नही होगा। तो नहीं लेंगे लेकिन ६ महिने बाद जब एम.बी.बुक एन्ट्री करना हो तो वह बहुत मुश्किल काम है।

**दिपक खांबित :-**

जहाँपर रस्ता उठाने का है वहाँपर खोदाई का काम नहीं है। वहाँ पर जो आयटम करते है वही लिया जाता है।

**राजेंद्र जैन :-**

आपका जो वर्क ऑर्डर है, वह कॉमन है। इसलिए में बोल रहा हूँ, उसमें जो एस्केलेशनका पॉईंट निकाला जाए।

**दिपक खांबित :-**

ठिक है साहब।

**रोहिदास पाटील :-**

खांबित साहेब, त्यातल हे तथ्य आहे आहे ना की, त्या ठिकाणी आपण पुन्हा-पुन्हा भरणी करुन रस्ता उचलत चाललो. जुन्या इमारती आहेत. त्याच्या दुकानामध्ये पाणी घुसते. आपल गटर बनल. उंची किती वाढवायची त्याची काही लिमिट असेल ना.

**दिपक खांबित :-**

अशा ठिकाणी आपण खोदुन करणार आहोत.

**रोहिदास पाटील :-**

नाही केल ना.

**दिपक खांबित :-**

आपका पॉईंट बराबर है। इस्टीमेट रिवाईज करके लेते है।

**शर्मिला बगाजी :-**

खांबित साहेब, आम्ही सुध्दा रात्रीची काम करतो. आता ग्राऊंटींग झाल आहे. उद्या पासुन आमच्याकडे उत्सव चालू आहे. त्याच्यासाठी एवढ्या लवकर काम चालू केली. पण, डांबरीकरणाच काय करणार?

**दिपक खांबित :-**

डांबरीकरण करायला पाऊस सुरु आहे ना.

**शर्मिला बगाजी :-**

पाऊस कुठे आहे आता. पॅचवर्क ..................

**दिपक खांबित :-**

पावसाळ्यात नाही होत. ८ जून पर्यंतचा रेकॉर्ड आहे. एक दिवस सुध्दा पाऊस थांबलेला नाही. २७/८/१३ पर्यंत.

**शर्मिला बगाजी :-**

आता पॅचवर्क तर करता ना डांबरीकरणाच?

**दिपक खांबित :-**

पण ते थिकनेस नाही होणार नंतर तुम्हीच बोलणार पावसात काम केल, पूर्ण नाही झाल.

**शर्मिला बगाजी :-**

तुम्ही शाश्वती पण देता की, ३० तारखेपर्यंत सगळ पूर्ण होईल. आता पाऊस आहे.

**दिपक खांबित :-**

रस्ता करण्याचे पण प्रकार आहे. त्याच्यामध्ये पण स्टेजेस आहे. डब्ल्यू.एम. रस्ता असतो ग्राऊंटींग असतो, डांबरीकरण असतो त्याच्यातुन तुमचा दोन लेवल पर्यंत आम्ही करुन ठेवल आहे. तो पूर्ण रस्ता डांबरीकरण केला तर निघुन जाईल.

**शर्मिला बगाजी :-**

मग ते कधी होणार?

**दिपक खांबित :-**

खालपर्यंत सुक लागते ५ ते ६ दिवस आहेत. पूर्ण ड्राय झाल असेल तरच ते टिकते नाहीतर टिकत नाही.

**शर्मिला बगाजी :-**

मग, आता किती दिवसात होणार? कारण, ऑलरेडी सात दिवस झाले आहेत.

**दिपक खांबित :-**

आता नाही होणार. वेलंकनी यात्रेनंतरच हाईल.

**शर्मिला बगाजी :-**

आणि पॅचवर्क पूर्ण करणार.

**रोहिदास पाटील :-**

आता, आम्ही या सभागृहात तुम्हाला विनंती केली होती. हा विषय की, तुम्ही कृत्रिम तलाव तयार करा. आम्ही सांगितल नवघर शाळेमध्ये मैदान पूर्ण खोदल झाल त्या जे.सी.बी. पडली. जे.सी.बी. खोदतेवेळी पडली. परत आता ते सपाट केल. काय कारण आहे? जेव्हा सभागृहात सदस्य आम्ही सांगतो की, हे योग्य की अयोग्य आहे. अस निट रेकॉर्डिंग झाल तरी परत काम चालू झाल. काम चालू झाल्यानंतर खोदते वेळी मुल तिथ खेळतात, शाळा भरते सगळ आहे. जे.सी.बी. मशिन खड्डयात पडली. बाहेर काढली, नंतर डोंगरासारखा ढिगारा झाला परत काही कोणी आदेश दिला लेवल केल. आता एकदम चिखल मैदान आहे. शाळा आहे की काय आहे? आपल्या शाळेच आपण मुल्यांकन कमी करतो.

**दिपक खांबित :-**

नवघर शाळेच्या मैदानात आपण कृत्रिम तलाव करणार आहोत. पण दरम्यानच्या काळात तिकडे दहीहंडी करीता आपल्या प्रभाग अधिकाऱ्याने परवानगी दिले. त्यामुळे त्यांना अडथळा येऊ नये म्हणून ठेकेदाराला सांगितल तिथे मातीच लेवल करुन घे. दहिहंडीचा प्रोग्राम झाल की, नंतर आपण कृत्रिम तलाव करुन घेऊ. तुम्ही पुण्याला जा, ठाण्याला जा त्यांनी जवळ जवळ तलावामध्ये पर्यावरण दृष्टीने विसर्जन करायच हळुहळु ८० टक्के

आटोक्यामध्ये आणल आहे. आणि आपल्याला पण हे सुरु करायच आहे. तलावामधल हे विसर्जन आहे ते टप्प्याटप्प्याने बंद करायच आहे. त्यामुळे कृत्रिम ठिकाण चालू वर्षी पाच ठिकाणी करतो. आणि ह्यासाठी सर्व सदस्यांना माझी विनंती आहे की, सर्वांनी सपोर्ट कराव इकडे.

**प्रमोद सामंत :-**

पुण्यामध्ये किती गणपती असतात आणि मिरा भाईंदरमध्ये किती गणपती असतात त्याच काही कॅलक्युलेशन कळेल?

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही जागेच जे सिलेक्शन केल नवघर शाळेच मैदान हे तुम्हाला खरोखर योग्य वाटते. मग, करायच होत तर पाण्याच्या टाकीजवळ खड्डा करायला घ्यायला पाहिजे होत. खड्डयाचीच जागा होती. २० X ३० किंवा ४० X ५० चा खड्डा केला असता तरी कोण बोलायला आल नसत.

**दिपक खांबित :-**

काका, ही जागा आहे ना ती वाहतुक विभाग संबंधित पोलिस स्टेशनचे अधिकारी आणि महानगरपालिकेचे अधिकारी ह्या सगळ्यांनी मिळुन वाहतुकीच्या दृष्टीने तो एक सेंटर पॉईंट आहे. तिथुनच ट्रॅफिक वळू शकते. ह्या दृष्टीने सिलेक्ट केलेल आहे. महानगरपालिकेने सिलेक्ट केलेल नाही. आणि त्याप्रमाणेच आपण काम करतो.

**प्रविण पाटील :-**

खांबित साहेब, तुम्ही सांगतात आणि काका सांगतात त्या जागेमध्ये ५०० मीटर च पण अंतर नाही.

**दिपक खांबित :-**

पण, आत मधल्या रस्त्यावर जमेल ना.

**प्रविण पाटील :-**

आणि ५०० मी. मध्ये कुठली वाहतुक येणार कुठे तो रहदारीचा रस्ता आहे. वाहतुक विभागाने असा कसा रिपोर्ट दिला. काका सांगतात जी जागा कृत्रिम तलावासाठी परफेक्ट होती. आमचा कृत्रिम तलावासाठी विरोध नाही. आणि ती जी जागा खोदलेली आहे ती नेहमी वाचवण्यात येणारी जागा आहे. आणि ते खेळाच मैदान होत.

**दिपक खांबित :-**

कृत्रिम तलावामध्येच सगळे विसर्जन करतील. म्हणून ती जागा आम्ही सिलेक्ट केली.

**प्रविण पाटील :-**

आता पण तुम्ही कुठे गॅरेन्टी घेता की पॅचअप करणार अस.

**दिपक खांबित :-**

हे सगळे विसर्जन जे आहे ते कृत्रिम तलावामध्येच व्हायला पाहिजे. तुम्ही तलावाजवळ नेल की, लोक बोलता ......................

**बर्नड डिमेलो :-**

काका, ज्यांना टाकायच ते कृत्रिम तलावात टाकतील पण ती महापालिकेने सोय केली. ज्यांचे १-२ दिवसाचे असतात त्यांना करायचे ते करतील. ते काय कायमस्वरुपी नाही. पुढच्या वेळी आपण बघू.

**प्रविण पाटील :-**

सांगायचा उद्देश काय की, ती जागा रोजची वापरण्याची जागा आहे. आधिच तिथे खेळाच मैदान आहे, शाळा आहे, कॉलेज आहे. परत येण्या-जाण्याचा रस्ता आहे.

**दिपक खांबित :-**

साहेब, फक्त १० दिवसाचा प्रश्न आहे.

**प्रमोद सामंत :-**

ह्याच्यात कुठे चुका झाल्या असतील जागा निवडण्यामध्ये तर फेरविचार करावा. नाहीतरी तुम्ही खड्डा बुजवलेला आहे. फेरविचार करावा आणि जी जागा कुठे शिफ्ट करता येईल तिथे करा.

**प्रविण पाटील :-**

तुम्ही सांगितल्याप्रमाणे कृत्रिम तलावाला विरोध नाही. पण तिथे नका करु.

**रोहिदास पाटील :-**

रात्री निवारा केंद्राबद्दल आयुक्त साहेबांनी सांगितल होत की, आपल्या प्रभागामधील बंद करतो पण ते झालच नाही. आपल्या प्रभाग ऑफिसमध्ये शाळा चालते. तिथे घरपट्टीच बिल भरल जाते. पाणी पट्टीच भरल जाते. रात्री निवारा बंद करा म्हणून पत्र दिल. तेव्हा आयुक्तांनी सांगितल की बंद करतो. आता नविन केसेस झाल्या. परत पेपरला निवारा आला तर आपण बंद करणार की नाही? काय नक्की ठरल?

**दिपक खांबित :-**

त्याबाबतच इतर ठिकाणी कुठे करु शकतो. त्याची चाचपणी सुरु आहे. रस्ता हा सुरु आहे.

**बर्नड डिमेलो :-**

काकांनी जो विषय काढला त्याबद्दल जरा बोलतो. गुजराती लोकही २०-२०, २५-२५ दिवस रात्र निवाऱ्यामध्ये राहतात. तिथे आपण पलंग वैगेरे सगळ्या सुविधा पुरवल्या. तर ज्यांना जी गरज आहे. जे यात्रेकरु असतात, वाटसरु असतात किंवा प्रवासी असतात किंवा परदेशातुन, गावातुन किंवा राज्यातुन आलेल्या लोकांना

निवारा भेटला पाहिजे. ही आपल्या कोर्टाची आणि शासनाची मान्यता आहे. पण ह्याच्यामध्ये दुरुपयोग होतो भाड्याने दिले जातात. त्यांच्या चांगल्याप्रकारे सुविधा पुरविल्या जातात. तर १-१ व्यापारी लोक गुजरात वरुन येऊन रात्र निवाराचा उपयोग करतात. तर मला वाटते की, तिथे नियम किंवा देखरेख काहीतरी आहे की नाही? नाहीतर तिथे आत्महत्या केला किंवा काहीतरी प्रसंग घडतील.......................

**दिपक खांबित :-**

हे रात्रनिवारा जे आहे ना ते संचलन देखभाल दुरुस्ती करीता खाजगी संस्थांना दिलेली आहे. पण अस निदर्शनास आले आयुक्त साहेब सुध्दा स्वतः पाच ठिकाणी फिरले आणि त्यांनी सुध्दा प्रत्यक्ष त्यांचे रेकॉर्ड बधितले. लोकांशी विचारपूस केली. त्यामुळे तिकडे आपल्या अटीशर्तींचा भंग झालेला आहे. हे निदर्शनास आलेले आहे आणि त्या लोकांशी केलेले करारनामे हे रद्द करण्याची कारवाई सुरु आहे आणि लवकरच त्यावर आपण कारवाई करु.

**प्रमोद सामंत :-**

विषय आपला असा होता की, मिरा भाईंदर क्षेत्रातील रस्त्यांवर वारंवार खड्डे पडणारे रस्त्यांचे नुतनीकरण करणे याबाबत निर्णय घेणे. आपल्याकडे यावेळी बजेट जवळ जवळ नाही आहे. तर या विषयामुळे असे ठरवायचे आहे की, ह्या पुढे ज्या ज्या ठिकाणी पावसाळ्यात मोठे खड्डे येतात म्हणजे जे जंक्शनचे ठिकाण आहे, काशिमिरा, शिवाजी पुतळ्याचा परिसर असो, एस.के. स्टोन असो, सिल्वर पार्क असो, गोल्डन नेस्ट असो किंवा आणखीन इतर ठिकाणी जिथे तुम्ही मार्क करतात. नवघर असो गोडदेवचे जंक्शन असो या ठिकाणी पुढच्या बजेटमध्ये तिथे कॉंक्रीटीकरण करण्याचे थोडे बजेट ठेवण्यात यावे. यातुन हा एक निष्कर्ष काढला पाहिजे असे मला वाटते आणि दुसरे बाकी सगळे युटीलीटी बद्दल बोलले. ती युटीलीटी तर सगळीकडेच आहे. आपण दिलाच पाहिजे. पण त्या देताना गेल्यावेळी माझा इन्फोटेकचा विषय होता की, आपण त्यांना चेंबर करण्यास देवू नये. ज्या ज्या ठिकाणी आपण चेंबर केलेली आहे. त्या ठिकाणी तुम्ही पाहणी करावी. त्याच्या बाजूबाजूच्या परिसरात खड्डे झालेले आहेत. त्याला कोण जबाबदार आहे? त्याचावरचा खर्च कोण करणार आहे? झालेला खर्च आपण त्यांच्याकडून भरुन घेणार का? ते खड्डे चेंबर बुजवणार का? याबाबत माझ्या एकाही पत्राला सविस्तर उत्तर गेल्या ६ महिन्यात डिपार्टमेंटकडून आलेले नाही. तिसरे आपण जे पॅचवर्कचे काम करतो. ते काम आपण मे महिन्यापर्यंत करु शकतो का?

**दिपक खांबित :-**

मे महिन्यापर्यंत होईल. तो पर्यंत खोदलेले रस्ते असतील ना ते तुम्ही करु शकता. पण पावसाळ्यात जे खड्डे पडतात ते तुम्ही कसे करणार?

**प्रमोद सामंत :-**

मला असे वाटते की, १५ मे पर्यंत जे खोदलेले खड्डे असतात ते पूर्ण करावे आणि आपल्याकडे दरवर्षीच असेल ना. ह्या परिसरात दरवर्षी खड्डे पडतात. मग ते इंटरनल रस्ते असो, मुख्य रस्ता असो किंवा आणखीन काही असो तर त्या परिसरामध्ये आपल्या इंजिनियरकडून पाहणी करावी. माझ्यामते जे खड्डे होतात ना ते त्या ठिकाणी रस्त्यावरचे पाणी साचल्यामुळे जास्त खड्डे होतात आणि ते पाणी का साचते, तर जे गटार आपण बंद केलेली आहे, गटारावर स्लॅब टाकलेले आहे. त्याचे खड्डे पाणी जाण्याचा रस्ता आहे. ते सगळेच बंद असतात. आपण जे साईड पट्टीचे काम दरवर्षी करतो. तिथे आपले रुलिंग होत नाही. तो भाग वरती झालेला असतो. बाकीचा भाग खाली असतो. त्यामुळे ते पाणी जात नाही. रस्त्यामध्ये पाणी साचते म्हणून ते खड्डे होतात. तर मी मागे तुम्हाला खांबित साहेब सांगितले होते की, ह्यापुढे आपण साईडपट्टी जी करतो ती करण्यात येवू नये किंवा केली १ फुट जागा आपल्या फुटपाथच्या बाजूला सोडण्यात यावी आणि तिथून ते पाणी बरोबर गटारात शिरते की नाही जात त्याचा निचरा होतो की नाही हे बघावे.

**रोहिदास पाटील :-**

तुमचेच ऐकून त्यावेळी आमच्याकडे सोडेल आणि तिथे गटाराचे बनवून ठेवले.

**प्रमोद सामंत :-**

काका, आम्ही जे बोलतो, चुकीच्या पध्दतीने वापर करण्यासाठी बोलत नाही. पण सिस्टम हवी ना. त्यासाठी बोला तुम्ही काय बोलायचे ते.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आप जो बोल रहे है, आपको लगता खांबित साहब को मालुम नही है।

**प्रमोद सामंत :-**

मालुम रहेगा।

**दिपक खांबित :-**

मालुम है। आज मुझे ४० जे.ई. चाहिए। मेरे पास ६ वॉर्ड होके भी ५ जे.ई. है। किधर से करे। काम के लिए आदमी भी चाहिए ना।

**प्रमोद सामंत :-**

जे.ई. नाही, माणसे नाहीत हा वेगळा विषय आहे. दुसरा असा विषय आहे की, २ वर्ष जर त्या ठेकेदाराने ते खड्डे मेन्टेन केले पाहिजे असे आपल्या ॲग्रीमेंटप्रमाणे असेल तर ह्या वर्षी कोणत्या ठेकेदाराचे किती पैसे कापले किंवा............

**दिपक खांबित :-**

हे सगळे चेक करायला पण माझ्याकडे माणसे नाहीत.

**प्रमोद सामंत :-**

माणसे नाहीत म्हणून आपण त्यांचे कोणते पैसे..........

**दिपक खांबित :-**

करणार. पण त्याला वेळ लागेल.

**प्रमोद सामंत :-**

गेल्या वर्षी अशा प्रकारच्या फाईन आपण किती लावलेला?

**दिपक खांबित :-**

आपण गेल्यावर्षी केले होते. त्याची पण माहिती आपल्याकडे आहे. ती माहिती तुम्हांला सगळ्यांना देईन पण ह्या करिता पण वेळ लागेल.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

जो डी.एल.पी. फाईन बोला ना, मैने साहब को लेटर दिया था और साहब ने २ घंटे के अंदर पिछले १० मिनिट मे तयार करके दे दिया। एम.बी. को तयार करके यह कुछ मतलब नही। मतलब की आपकी बात बहोत अच्छी है की, मे के पहले पहले पैच वर्क हो जाये तो बहोत अच्छा रहेगा।

**प्रमोद सामंत :-**

मा. सभापती महोदय, आपण याबाबत प्रॉपर रुलिंग द्यावी. आम्हांला काही ॲक्स्पेप्ट नाही.

**मा. सभापती :-**

सचिव साहेब दुसरा विषय घ्या.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही एवढी माहिती द्या की, आपण एम.एम.आर.डी.ए. ची धोकादायक इमारतीच्या लोकांना आपण त्याच्यामध्ये समाविष्ट करु शकतो का? अशी एम.एम.आर.डी.ए. ची घरे आपल्याकडे किती आहेत, अशी काही व्यवस्था आपल्याकडे आहे का? अधिकृत माहिती सांगा ना. सगळे सोसायटीवाले आम्हांला विचारतात. एवढ्या घरांची संख्या मिळू शकते अशी काय व्यवस्था आहे का?

**सत्यवान धनेगावे :-**

एम.एम.आर.डी.ए. च्या रेन्टल हाऊसिंग स्कीममध्ये ६ प्रोजेक्ट सुरु आहेत. ६ प्रोजेक्ट मधून सदनिका मिळणार आहेत. त्याबाबत शासनाकडून धोरण अजून नक्की झालेले नाही.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही होर्डिंग्ज वगैरे वाचतो म्हणून.

**(मिरा-भाईंदर क्षेत्रातील रस्त्यावर वारंवार खडे पडणा-या रस्त्यांचे मजबुतीकरण करणे बाबत आढावा घेण्यात आला.)**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७९, भूयारी गटारे योजने मार्फत खोदलेले रस्ते व दुरूस्ती केलेल्या रस्ते इत्यादी कामाचा आढावा घेणे बाबत.

**सुरेश वाकोडे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. भुयारी गटार योजनेमध्ये आपण जी पाईप लाईन टाकलेली होती. तर ते डेप्ट वगैरे ४ मि., ६ मि. अशा डेप्टला आपण लाईन टाकली. तर लाईन टाकल्यानंतर ते रिफील आपण करतो आणि त्याच्यावर कॉम्पेशन करतो. पण ते डेप्ट जास्त असते. कॉम्पेशन एवढी प्रॉपर्ली होऊ शकत नाही त्यामध्ये. इव्हन आपण व्हायब्रेट रोलरने ही कॉम्पेशन करण्याचा प्रयत्न करतो. पण त्यामध्ये खालचा पाईप फुटण्याची भिती वाटते. तर त्या केसमध्ये आपण रस्ते दुरुस्ती करुन रोड चालु केले होते. पण ते रस्ते काही ठिकाणी डांबरीकरण केले नाही. त्यावेळेला अपण कॉन्ट्रॅक्टरला सांगितले होते की, शहराची गरज आहे. आता कुठल्याही परिस्थितीमध्ये पावसाळ्यापूर्वी करणे गरजेचे आहे. पण याच्यामध्ये जर काही खड्डे पडले की, दुरस्ती करायची असेल तर तुम्हाला फ्री ऑफ कॉस्ट मध्ये करावी लागेल. त्यानुसार आता त्यांनी जे रस्ते मागच्यावर्षी केलेले आहेत त्याच्यामध्ये जे दुरुस्तीची कामे त्याठिकाणी ग्राऊंटींग काही ठिकाणी प्रपोज केलेली त्या ठिकाणी ग्राऊंटींग केलेली आहे. पॅचवर्कचे काम चालु केलेली आहेत आणि साधारण ७० टक्के कामे झालेली आहेत.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय, आपल्या गोषवा-यात ते आलेले नाही. परत तीच परिस्थिती आहे.

**मा. सभापती :-**

आढावा आहे ना.

**प्रशांत दळवी :-**

आढावा आहे, ठिक आहे. परंतु तोंडी बोलून तुम्ही आम्हाला हे सांगत आहे. वस्तुस्थिती तिकडे काय आहे? आपण एस.पी.एम.एल. कंपनीला ठेका दिलेला आहे. पूर्ण रस्तेच्या रस्ते खोदलेले आहेत. असे आहे का त्या ॲग्रीमेंटमध्ये? त्यांनी पूर्ण रस्ते खोदावे का? पूर्ण रत्याची वाट लागलेली आहे. पूर्ण रस्ते खोदलेले आहेत. आता ही त्याठिकाणी स्थायी समितीचे सदस्य गेले तर तिकडे बघा, खाली खडीकरण वगैरे काही नाही सरळ तिथे डांबर टाकून मोकळे झालेले आहेत. त्यांच्या ॲग्रीमेंटमध्ये काय म्हंटलेले आहे. अडीच फुट पर्यंत खडीकरण हवे. आहे का त्यात?

**सुरेश वाकोडे :-**

आयटमवाईज टेंडर आहे. आता स्नेहांजलीचा रस्ता आहे त्या ठिकाणी आपण रेक्टीफिकेशन केले. त्या ठिकाणी पॅचवर्क होते तिथे आपण बीएम मारला आणि ज्याठिकाणी खड्डे पडलेले तिथे रेक्टीफिकेशन केलेले आहे.

**प्रशांत दळवी :-**

मला सांगा, जिथे रस्ते खोदले तिथे अडीच फुटाचे खडीकरण व्हायला हवे की नको?

**सुरेश वाकोडे :-**

त्या ठिकाणी केलेले आहे.

**प्रशांत दळवी :-**

चिखल आहे. माझी तुम्हांला विनंती आहे की, ह्या रस्त्याची आपण पुर्ण पाहणी करु या. त्यांचे रस्त्यांचे जे तज्ञ आहेत त्यांच्या बरोबर आपण पाहणी करायची. तुम्ही तिथे खोदून बघा. अडीच फुटाचे ॲग्रीमेंटमध्ये खडीकरण केले पाहीजे अशा प्रकारचे आहे. तिकडे त्याने खडी टाकली का?

**सरेश वाकोडे :-**

साहेब, हे सगळे डिजाईन प्रमाणे असते. काही ठिकाणी ६-६ मिटर असते. त्या ठिकाणी २-२, ३-३ फुट होऊ शकतो.

**प्रशांत दळवी :-**

टाकत असाल तर तुम्ही आजुबाजुचा रस्ता का खोदता?

**सुरेश वाकोडे :-**

तुम्ही पर्टीक्युलर रस्ता सांगा, त्याबाबतच मी तुम्हांला सांगतो.

**प्रशांत दळवी :-**

सगळेच रस्ते. माझे असे मत आहे की, जिथे तुमचे काम चालु आहे.

**मुन्ना सिंग :-**

सन्मा. सदस्य जो बता रहे है वह जो खडी डालने का वह ॲग्रीमेंट मे है।

**प्रशांत दळवी :-**

साहेब, एवढेच नाही की त्या ठेकेदाराला पाठिशी घातले. ९० फुट रोडवर त्याला महानगरपालिकेचे ऑफीस दिले. तर का ऑफीस दिले? ऑफीस दिले की, भाडे घेतो त्यांच्याकडून?

**सुरेश वाकोडे :-**

ऑफीस दिलेले आहे. तो टेंडरचा पार्ट आहे.

**प्रशांत दळवी :-**

किती पैसे घेतले आतापर्यंत आपण त्यांच्याकडून?

**सुरेश वाकोडे :-**

साहेब, तो एक टेंडरचा पार्ट आहे. टेंडरमध्ये जेव्हा आपण मोठा प्रोजेक्ट करतो ५०० कोटीचा प्रोजेक्ट करतो. तर आपल्याकडे ऑर्डीनेशन पाहिजे. काय होते प्लानिंगसाठी म्हणून त्या टेंडरमध्ये कंडीशन अशी होती की, आपण ती जागा उपलब्ध करुन द्यायची.

**प्रशांत दळवी :-**

मग, आपण जागा उपलब्ध करुन द्यावी त्यांना.

**सुरेश वाकोडे :-**

हो. तशी कंडीशन आहे.

**प्रशांत दळवी :-**

पैसे घेतो त्यांच्याकडून?

**सुरेश वाकोडे :-**

आपण द्यायची आहे. टेंडरमध्ये कंडीशन आहे. आपण त्यांना जागा द्यायची.

**प्रशांत दळवी :-**

आपण त्यांना फुकटमध्ये जागा द्यायची.

**सुरेश वाकोडे :-**

हो सर. कामासाठी ऑफीससाठी जागा द्यायची आहे.

**मा. सभापती :-**

तुमच्या ॲग्रीमेंटमध्ये जे असेल त्या पध्दतीने बनवून द्याव्यात.

**रोहिदास पाटील :-**

तसे नाही. वाकोड साहेबांनी सांगावे कोणते रस्ते, किती कि.मी. चे ४ ते ६ मी., ६ मी म्हणजे ६ X ३ = १८ फुट. तर १८ फुट खोलीचे खोदकाम ह्या रस्त्यावर केले की, त्या रस्त्यावर केले. मला असे ८-१० रस्त्यांची नावे सांगा ना. जिथे तुम्ही १८ फुट खोलीचे खोदकाम केले. पूर्वेला कुठे केले? मिरारोडला कुठे केले? पश्चिमेला कुठे केले? पश्चिमेच्या ९० फुटाच्या रस्त्यावर १८ फुट खोल आम्ही केले, असे २-४ रस्त्यांची नावे आम्हांला सांगा. तुम्ही निवेदन केले ४ ते ६. मिनिमम ४ मॅक्झीमम ६. ६ असेल ६ X ३ = १८ फुट, १२ ते १८ फुट रस्त्याचे खोदकाम केले. ६ मी. रस्त्याचे खोदकाम केलेले कोणते रस्ते. ह्या ठिकाणी खोदकाम करुन त्याने काम केले.

**सुरेश वाकोडे :-**

कनकियाचा मेन रोड आहे. कनकियाच्या मेन रोडला आपण ६.५० मी. डेप्टला काम केलेले आहे. आता काम बंद आहे.

**प्रशांत दळवी :-**

शितल नगरला स्नेहांजली येथे काम केले. त्या रस्त्याचे आज ३ वेळा पॅचवर्क चालु आहे आणि आपली महापालिका पॅचवर्क करते. जर त्यांनी अडीच फुटाचे खडीकरण केले असते, तिकडे तो रस्ता व्यवस्थित बांधला असता. आता तिसऱ्यांदा ही खड्डे पडलेले आहेत. तिथे ही माझ्याबरोबर चला. मा. सभापती महोदय, हा विषय फार गंभीर आहे. या विषयामुळे रस्त्याची फार दुरावस्था झालेली आहे. मी तुम्हांला सांगतो, तज्ञ पथक नेमण्यात यावे आणि आपल्या स्टॅन्डींग कमिटीने या सगळ्या रस्त्याचा दौरा करावा. जेणेकरुन तुम्हांला वस्तुस्थिती निदर्शनास येईल. आज ॲग्रीमेंटमध्ये काय म्हंटले आणि इकडे काय चाललेले आहे. तिथे चिखल आहे, चिखलवर दगड टाकुन पॅचवर्क करतात.

**प्रमोद सामंत :-**

ही खरी परिस्थिती आहे. आता जे काम झाले, एस.पी.एम.एल. ने जो रस्ता रेक्टीफाय केला. तो रस्ता असाच त्याने केला. वरती साफसफाई नाही, काही नाही. आपल्याला त्या विषयाची घेणं नाही. फक्त तो रस्ता व्यवस्थित झाला पाहिजे. कारण त्यांना ते परत मेन्टन करायचा आहे.

**प्रशांत दळवी :-**

खोदलेल्या रस्त्याची ६-६, ७-७ फुट रस्त्याचे खोदल्याचे त्यांनी डांबरीकरण कशाप्रकार करावे त्याबद्दल आपण थोडेसे मार्गदर्शन करावे. कसे करायला पाहिजे त्यांनी?

**सुरेश वाकोडे :-**

स्नेहांजलीचा पुढचा रोड खोदायचा आहे. त्यामुळे आपण त्या ठिकाणी मोठे खडीकरण केलेले नाही. आता फक्त पॅचवर्क म्हणून त्या ठिकाणी बी.एम. मारुन तात्पुरत्या स्वरुपात ओपन केलेले आहे. आणि बाकीची उरलेली कामे ४-५ दिवसात पूर्ण करणार आहे. काही ठिकाणी ग्राऊंटींचा रस्ता आहे.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय, त्यांनी सांगितल्याप्रमाणे आपण त्या त्या रस्त्यांची पाहणी करु ना.

**मा. सभापती :-**

पुढचा विषय घेण्यात यावा.

**(भूयारी गटारे योजने मार्फत खोदलेले रस्ते व दुरूस्ती केलेल्या रस्ते इत्यादी कामाचा आढावा घेण्यात आला.)**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८०, निविदेस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**राजेश वेतोसकर :-**

| अ. क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर | मा.आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | **मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत सर्वधर्मीय उत्सव व कार्यक्रमासाठी मंडप,लाईट,स्टेज, खुर्ची पार्टीशन, स्पीकर सेंट, जनरेटर, टेबल इत्यादी व्यवस्था करणे.** | रु. १,०३,००,०००/- | दि. ५/०५/२०१३ | दै. पुण्यनगरी/दै. फ्रि प्रेस जरनल दि. १३/७/२०१३ | दि १६/७/२०१३ |

| | | | SHIVLEELA DECORATORS | MUNJAL THEMES & OCCASIONS PVT.LTD | DHARAVI DECORATORS | |
|---|---|---|---|---|---|---|
| **ITEM CODE** | **DESCRIPTION** | **Unit** | | | RATE | **दरवाटाघाटीनंतर RATE** |
| 1 | Mandap Water Proof | Sqft | 40 | 50 | 27.50 | **27.50** |
| 2 | Chair | No | 15 | 20 | 10 | **10** |
| 3 | Table | No | 50 | 51 | 43 | **42** |
| 4 | Generator | No | 18000 | 20000 | 15950 | **15500** |
| 5 | Wooden Railing | Rft | 50 | 54 | 38.50 | **38** |
| 6 | Speaker set | No | 10000 | 9000 | 6050 | **6000** |
| 7 | Halogen | No | 125 | 120 | 110 | **110** |
| 8 | HM Light | No | 5000 | 55 | 4510 | **4500** |
| 9 | Stage a)8 ft | Sqft | 135 | 140 | 128 | **120** |
| | b) 6 ft | Sqft | 105 | 115 | 96 | **90** |
| | c) 4 ft | Sqft | 70 | 75 | 64 | **60** |
| | d) 2.5 ft | Sqft | 45 | 47 | 40 | **40** |
| 10 | Partition | Rft | 30 | 35 | 27 | **27** |
| 11 | Carpet | Sqft | 3 | 2.95 | 2.50 | **2.50** |
| 12 | Stand Fan | No | 500 | 500 | 430 | **425** |
| 13 | Dunlop Chair | No | 60 | 75 | 1 | **55** |
| 14 | Series Light | No | 1.75 | 2.50 | 1 | **1** |
| 15 | Sofa | No | 525 | 600 | 500 | **500** |
| 16 | Patra Bare getting | Rft | 112 | 125 | 100 | **100** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | **मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सर्वधर्मीय उत्सवा अंतर्गत विविध ठिकाणी लाकडी तराफ्याची, क्रेन, हायड्रा, फोर्क लिफ्ट् इ. व्यवस्था करणे.** | रु. ३०,००,०००/- | दि.१५/०५/२०१३ | दै. वृत्तामानस / दै. सुरज प्रकाश दि. १३/७/२०१३ | दि १६/७/२०१३ |

| | | | SHIVLEELA ECORATORS | SHAGIRD DECORATORS | KAUSHIK PATIL | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **ITEM CODE** | **DESCRIPTION** | **UNIT** | RATE | RATE | RATE | **दरवाटाघाटीनंतर RATE/Hr** | **दरवाटाघाटीनंतर RATE/8 Hr** |
| 1 | Boat | Per Shift 8hrs Shift (Rate of 1 hours) | 2379 | 2255 | 1620 | **-** | **9630/-** |
| 2 | Wooden Tarrafe | Per Day | 12509 | 11155 | 8910 | **-** | **8550/-** |
| 3 | Hydraulic Crane | Hr | 2339 | 2555 | 1593 | **1554/-** | **12060/-** |
| 4 | Fork Lift | Hr | 2219 | 2055 | 1493 | **1453/-** | **11810/-** |

वरील तुलनात्मक तक्ता पहाता अ.क्र. १ च्या कामी **मे. धारावी डेकोरेटर्स** यांची **दरवाटाघाटीनंतर वरील दराची**, अ. क्र. २ च्या कामी **मे. कौशिक पाटील** यांची **दरवाटाघाटीनंतर वरील दराची** निविदा या मधील दर सर्वात कमी आहेत. सदर निविदांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**अनिता पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८० :-**

निविदेस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ७३ :-**

| अ. क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर | मा.आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | **मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत सर्वधर्मीय उत्सव व कार्यक्रमासाठी मंडप,लाईट,स्टेज, खुर्ची पार्टीशन, स्पीकर सेंट, जनरेटर, टेबल इत्यादी व्यवस्था करणे.** | रु. १,०३,००,०००/- | दि. ५/०५/२०१३ | दै. पुण्यनगरी/दै. फ्रि प्रेस जरनल दि. १३/७/२०१३ | दि १६/७/२०१३ |

| | | | SHIVLEELA DECORATORS | MUNJAL THEMES & OCCASIONS PVT.LTD | DHARAVI DECORATORS | |
|---|---|---|---|---|---|---|
| **ITEM CODE** | **DESCRIPTION** | **Unit** | | | RATE | **दरवाटाघाटीनंतर RATE** |
| 1 | Mandap Water Proof | Sqft | 40 | 50 | 27.50 | **27.50** |
| 2 | Chair | No | 15 | 20 | 10 | **10** |
| 3 | Table | No | 50 | 51 | 43 | **42** |
| 4 | Generator | No | 18000 | 20000 | 15950 | **15500** |
| 5 | Wooden Railing | Rft | 50 | 54 | 38.50 | **38** |
| 6 | Speaker set | No | 10000 | 9000 | 6050 | **6000** |
| 7 | Halogen | No | 125 | 120 | 110 | **110** |
| 8 | HM Light | No | 5000 | 55 | 4510 | **4500** |
| 9 | Stage a)8 ft | Sqft | 135 | 140 | 128 | **120** |
| | b) 6 ft | Sqft | 105 | 115 | 96 | **90** |
| | c) 4 ft | Sqft | 70 | 75 | 64 | **60** |
| | d) 2.5 ft | Sqft | 45 | 47 | 40 | **40** |
| 10 | Partition | Rft | 30 | 35 | 27 | **27** |
| 11 | Carpet | Sqft | 3 | 2.95 | 2.50 | **2.50** |
| 12 | Stand Fan | No | 500 | 500 | 430 | **425** |
| 13 | Dunlop Chair | No | 60 | 75 | 1 | **55** |
| 14 | Series Light | No | 1.75 | 2.50 | 1 | **1** |
| 15 | Sofa | No | 525 | 600 | 500 | **500** |
| 16 | Patra Bare getting | Rft | 112 | 125 | 100 | **100** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | **मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सर्वधर्मीय उत्सवा अंतर्गत विविध ठिकाणी लाकडी तराफ्याची, क्रेन, हायड्रा, फोर्क लिफ्ट् इ. व्यवस्था करणे.** | रु. ३०,००,०००/- | दि.१५/०५/२०१३ | दै. वृत्तामानस / दै. सुरज प्रकाश दि. १३/७/२०१३ | दि १६/७/२०१३ |

| | | | SHIVLEELA ECORATORS | SHAGIRD DECORATORS | **KAUSHIK PATIL** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **ITEM CODE** | **DESCRIPTION** | **UNIT** | RATE | RATE | RATE | **दरवाटाघाटीनंतर RATE/Hr** | **दरवाटाघाटीनंतर RATE/8 Hr** |
| 1 | Boat | Per Shift 8hrs Shift (Rate of 1 hours) | 2379 | 2255 | 1620 | **-** | **9630/-** |
| 2 | Wooden Tarrafe | Per Day | 12509 | 11155 | 8910 | **-** | **8550/-** |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | Hydraulic Crane | Hr | 2339 | 2555 | 1593 | **1554/-** | **12060/-** |
| 4 | Fork Lift | Hr | 2219 | 2055 | 1493 | **1453/-** | **11810/-** |

वरील तुलनात्मक तक्ता पहाता अ.क्र. १ च्या कामी **मे. धारावी डेकोरेटर्स** यांची **दरवाटाघाटीनंतर वरील दराची**, अ. क्र. २ च्या कामी **मे. कौशिक पाटील** यांची **दरवाटाघाटीनंतर वरील दराची** निविदा या मधील दर सर्वात कमी आहेत. सदर निविदांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. राजेश वेतोसकर अनुमोदन :- श्रीम. अनिता पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८१, मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८१ :-**

मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ७४ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील करावयाच्या खालील कामांना मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

| **अ.क्र** | **कामाचे नांव** | **अंदाजित खर्च** | **ठेकेदाराचे नांव / कामाचा दर** | **मंजूर दर** |
|---|---|---|---|---|
| १ | मिरारोड (पू.) प्रभाग क्र. ४४ येथील अहेलेहादिस जामा मस्जिद समोर मक्सुद चाळ येथे गटार बांधून चेकर्ड लादया बसविणे. (नगरसेवक निधी) | रु. ९,९६,३००/- | मे. रिध्दीका इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दराने |
| २ | मिरारोड (पू.) शितलनगर येथिल शितल होम ते रश्मीपार्क पर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. (नगरसेवक निधी) | रु. ९,९९,९५०/- | मे. मुस्कान इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दराने |
| ३ | मिरारोड (पू.) शांतीनगर सेक्टर नं. १ मधील इमारत क्र. २७ ते इमारत क्र. बी/४७ पर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. (नगरसेवक निधी) | रु.९,९९,३००/- | मे. मुस्कान इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दराने |
| ४ | मिरारोड (पू.) भारतीपार्क येथील रितु अपार्टमेंट ते अंतपुरा हॉटेल पर्यंत सी.सी.गटार बांधून स्लॅब टाकणे. (नगरसेवक निधी) | रु. ८,४८,७७०/- | मे. कंचन कंन्स्ट्रक्शन कं | अंदाजपत्रकीय दराने |
| ५ | मुर्धा गांवदेवी मंदिरा शेजारील बालोउद्यानामध्ये समाजमंदिर बांधणे. (नगरसेवक निधी) | रु. १९,०४,८००/- | मे. श्रीगणेश इंटरप्रायझेस | दरवाटाघाटीनंतर २.००% कमी दराने |
| ६ | भाईंदर (पू.) प्रभाग क्र. १४, १५, १६ या प्रभागातील विविध ठिकाणच्या गटाराची, चेंबर्सची, क्रॉसिंगची स्लॅबसह दुरुस्ती M.S. झाकणे दुरुस्ती, पेव्हर ब्लॉक व चेकर्ड लादी दुरुस्ती करणे. | रु. ९,०७,५००/- | मे. कंचन कंन्स्ट्रक्शन कं | अंदाजपत्रकीय दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | भाईंदर (पू.) प्रभाग क्र. १५ मधील केबीन रोड ते नर्मदा नगर येथील नाल्याचे (नर्मदा गार्डन) चे सुशोभिकरण करणे. | रु. १२,२०,०००/- | मे. कंचन कंन्स्ट्रक्शन कं | अंदाजपत्रकीय दराने |
| ८ | भाईंदर(पू.) प्रभाग क्र. ११ व १३ मधिल विविध ठिकाणच्या गटारावरील स्लॅबची दुरुस्ती करणे. | रु. ९,६८,७००/- | मे. मुस्कान इंटरप्रायझेस | २.०० %कमी दराने |
| ९ | मिरारोड (पू.) भारतीपार्क येथील निरवपार्क ते लक्ष्मी डेअरी पर्यंत तसेच आर.के.इन हॉटेल जवळ सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु. ११,३९,२५०/- | मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कं | १२.५ %कमी दराने |
| १० | भाईंदर (प.) प्रभाग क्र. १ मधील गणेश देवल नगर नितिन चाळ महेश नगर, जय बजरंग नगर मधील पदपाथ वरील पेव्हर ब्लॉकची व सी.सी. रस्त्याची दुरुस्ती करणे. | रु. ७,४७,६५०/- | मे. एम.एस. इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दराने |
| ११ | भाईदर (पू.) यशवंतराव चव्हाण उद्यान ते किरणनगर मुख्य नाल्यापर्यंत नाल्याचे बांधकाम करणे. | रु. १६,२०,४५०/- | मे. राठोड ब्रदर्स | ०.५१ % कमी दराने |
| १२ | राई शिवनेरी येथे गल्लीनंबर १८ ते २३ मध्ये गटार बांधणे. | रु. ९,१४,४५०/- | मे. गुरुजी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | १६.५ % कमी दराने |
| १३ | उत्तन पातान बंदर येथे आल्बर्ट पासक्या, फ्रेंकी पाटील बस्ताव भंडारी, पिटर दिनीस यांच्या घरासमोरील सी. सी. रस्ता दुरुस्ती व चेकर्ड लादया बसविणे. | रु ८,८८,१००/- | मे.श्रीगणेश इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दराने |
| १४ | मिरारोड (पू.) शांतीनगर सेक्टर ४ मधील इमारत क्र. सी/५ ते अे/८ पर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु. १३,७७,९१०/- | मे.आशापुरा कंन्स्ट्रक्शन कं | १२.७ %कमी दराने |
| १५ | मिरारोड (पू.)निलम पार्क जवळील नयानगर येथील पुनम वर्षा ते श्रीहिना ॲव्हीन्यू पर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु. ५,६५,३५०/- | मे.राठोड ब्रदर्स | ०.५१ % कमी दराने |
| १६ | भाईंदर (पू.) प्रभाग क्र. १२ मधील लता कुंज गल्लीमधील श्रीनाथ सदन, हिरा सदन, गिता भवन इमारती समोरील गटाराचे बांधकाम करणे. | रु. १०,०४,१००/- | मे.मुस्कान इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दराने |
| १७ | भाईंदर (पू.) प्रभाग क्र. १२ मधील नवघर सत्संग समोरील खाडीकडे जाणारा कच्च्या नाल्याचे सी.सी. बांधकाम करणे. | रु. ७,२९,५००/- | मे.तिरुपती बालाजी इंटरप्रायझेस | १.०० %कमी दराने |
| १८ | भाईंदर (पू.) आनंदी इंड इस्टेट, साईनाथ इंड. इस्टेट येथे सी.सी रस्ते दुरुस्ती करणे व चेकर्ड लादया बसविणे. | रु. ९,८१,७००/- | मे. एकता कंन्स्ट्रक्शन | १२.०३% कमी दराने |
| १९ | मिरारोड (पू.) रामदेव पार्क रस्ता रामनगर येथिल गटार व क्रॉस ड्रेन बांधणे | रु. ६,३१,६५०/- | मे. कंचन कंन्स्ट्रक्शन कं | ७.२% कमी दराने |
| २० | मिरारोड (पू.) शितल सरोवर ते शितल राज, एम.टी.एन.एल रोड वरील आर.सी.सी. क्रॉस ड्रेन | रु. ५,१२,९००/- | मे. एकता कन्स्ट्रक्शन | १२.१२ % कमी दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | बनविणे. | | | |
| २१ | मिरारोड (पू.) कनकिया, जांगीड एनक्लेव्ह ते वासुदेव कॉम्प्लेक्स रोड पर्यंत गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु. ९,७९,८००/- | मे.एकता कंन्स्ट्रक्शन | १२.०३% कमी दराने |
| २२ | मिरारोड (पू.) बेवर्ली पार्क मेरी गोल्ड समोरील गटार व क्रॉस ड्रेन बांधणे. (एन.जी.वेदांत इमारत) | रु. १४,९५,४५०/- | मे. एकता कंन्स्ट्रक्शन | १२.०३%कमी दराने |
| २३ | मिरारोड (पूर्व) नयानगरकडे जाणाऱ्या रेल्वे समांतर डी.पी. रस्त्याच्या नाल्यांची रस्त्याच्या बाजूची उंची वाढविणे. | रु. २२,४०,९००/- | मे. मुस्कान इंटरप्रायजेस | दरवाटाघाटीनंतर २.००%कमी दराने |
| २४ | मिरारोड (पूर्व) पुनमसागर फेस ३ उद्यानामध्ये जॉगींग ट्रॅक, पाण्याची टाकी व पंपरुम बांधणे | रु. ११,५२,९५०/- | मे. मुस्कान इंटरप्रायझेस | दरवाटाघाटीनंतर २.००%कमी दराने |
| २५ | मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. ३०० खेळाचे मैदान सपाटीकरण करणे. | रु. १४,००,५००/- | मे. यश इंटरप्रायझेस | १२.०० % कमी दराने |
| २६ | मिरारोड (पू.) संघवी नगर जवळील सर्व्हे क्र. ३२९ हा बगीचा करीता कुंपण भिंत बांधणे. | रु. १६,४४,४००/- | मे. जय महाकाल कंन्स्ट्रक्शन | १३.०० % कमी दराने |
| २७ | राई व मोर्वा येथील सी.सी. पदपाथाची व लगतच्या गटारांची दुरुस्ती करणे. | रु. ७,३२,८१०/- | मे. जय महाकाल कंन्स्ट्रक्शन | ६.०० % कमी दराने |
| २८ | मिरारोड (पू.) येथील सुकाळ तलाव, जरीमरी तलाव व सातकरी तलावातील गाळ काढणे. | रु. १३,८९,०००/- | .मे. राठोड ब्रदर्स | दरवाटाघाटीनंतर १% कमी दराने |
| २९ | प्रभाग क्र. १३ मधील इंदिरा गांधी उद्यान, गोडदेव स्मशानभुमी व नवघर जुने तलाव येथील विविध कामे करणे. | रु. १८,६२,३००/- | .मे. आदित्य पाटील | १५.०० % कमी दरान |
| ३० | भाईंदर (प.) प्रभाग क्र. ०१ मधील नितिनचाळ शौचालय ते सुभाष मिश्रा यांच्या घरापर्यंत सी.सी. पाथवे तयार करणे. | रु. ११,२०,३००/- | मे.एम.एस इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दराने |

वरील कामांच्या निविदांना मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. सदर कामांचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये अवलोकन करण्यात आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**(सभा संपल्याची वेळ दुपारी १.५५ वा.)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**